दैनिक

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG

वैभव विवेक स्वामी
संपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष - ६ वे अंक -२५८ गुरूवार दि.२८ मे २०२६ 98 22 62 85 21 आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु । पाने ४

Beed Daily Marathi Year-6th Issue-258 Thursday, Dt.28 May 2026 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

# जनगणनेच्या कामाचा राज्यात चौथा बळी..!

## मावळमध्ये शिक्षिकेचा भीषण अपघाती मृत्यू, शिक्षकांमध्ये असंतोष..!!

बीड ।प्रतिनिधी

राज्यात सुरू असलेल्या जनगणना प्रक्रिये दरम्यान शिक्षकांवर टाकण्यात आलेल्या अतिरिक्त जबाबदाऱ्यांमुळे आता गंभीर प्रश्न निर्माण होऊ लागले आहेत. उन्हाळी सुट्टीत शाळा बंद असतानाही शिक्षकांना सक्तीने जनगणनेच्या कामासाठी रस्त्यावर उतरवण्यात येत असल्याने संताप व्यक्त केला जात असतानाच पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यात एका महिला शिक्षिकेचा भीषण अपघातात मृत्यू झाल्याने शिक्षक वर्ग हादरला आहे. या घटनेमुळे राज्यभरातील शिक्षक संघटनांनी प्रशासनाच्या धोरणावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

मृत शिक्षिकेचे नाव दीपाली तांबे असे असून त्या जनगणनेच्या शासकीय कामासाठी दुचाकीवरून जात असताना जुना पुणे-मुंबई महामार्गावरील कान्हे फाटा येथे भरधाव डंपरने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. अपघात इतका भीषण होता की त्यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेनंतर राज्यभरातील शिक्षकांमध्ये संतापाची लाट उसळली असून प्रशासनाच्या निष्काळजीपणावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

विशेष म्हणजे, जनगणनेच्या कामा दरम्यान मृत्यू झालेल्या शिक्षकांची संख्या आता राज्यात चारवर पोहोचली आहे. यापूर्वी भगवान पाटील (कोल्हापूर), राजाराम ढोले (सांगोला) आणि सुंदरम वांगसकर (लातूर) या शिक्षकांचाही अशाच शासकीय जनगणना कामा दरम्यान मृत्यू झाला होता. सलग घडणाऱ्या या घटनांमुळे शिक्षक संघटनांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे.

शिक्षक संघटनांनी प्रशासनावर थेट सवाल उपस्थित करत, शाळांना सुट्टी असताना शिक्षकांनाच का रस्त्यावर उतरवले जाते ? असा प्रश्न विचारला आहे. भर उन्हात दारोदारी फिरणे, वाहतुकीचा वाढता धोका, अपुरी सुरक्षा व्यवस्था आणि कामाचा वाढता ताण यामुळे शिक्षकांच्या आरोग्य व सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. विशेषतः ग्रामीण भागात अनेक शिक्षकांना स्वतःच्या वाहनाने लांब अंतर पार करावे लागत असल्याने अपघातांचा धोका अधिक वाढत असल्याचे दिसून येत आहे.

दरम्यान, शिक्षक संघटनांनी महामार्गांवर अवजड वाहनांच्या बेदरकार वाहतुकीवर नियंत्रण आणण्याची मागणीही केली आहे. शासकीय कामासाठी जीव धोक्यात घालणाऱ्या शिक्षकांच्या सुरक्षिततेची जबाबदारी कोण घेणार

### मृत्यू झालेल्या शिक्षकांच्या कुटुंबीयांना दहा लाख सानुग्रह अनुदान देवून अनुकंपा तत्त्वावर सरकारी नोकरी द्या..?

या पार्श्वभूमीवर कोल्हापूर जिल्हा खाजगी प्राथमिक शिक्षक महासंघाने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर करून कठोर भूमिका घेतली आहे. संघटनेचे अध्यक्ष राजेंद्र कोरे यांनी जनगणना कर्तव्य बजावताना मृत्यू झालेल्या शिक्षकांच्या कुटुंबीयांना किमान दहा लाख रुपयांचे सानुग्रह अनुदान द्यावे, कुटुंबातील एका सदस्याला अनुकंपा तत्त्वावर सरकारी नोकरी द्यावी तसेच जनगणनेच्या कामासाठी सुरक्षा नियमावली लागू करावी, अशी मागणी केली आहे.






### उन्हाचा झाला कहर शिक्षक झाले त्रस्त..!

जनगणना करत शिक्षकांना भर उन्हात दारोदार फिरावे लागत आहे. लोक नाहक भीतीपोटी खरी माहिती देत नाहीत. अर्धवट माहिती देवून उलट प्रश्नांचा भडीमार मोठ्या प्रमाणात करत आहेत. त्यातच उन्हाचा कहर झाल्याने जनगणना करणारे शिक्षक त्रस्त झाल्याचे जागोजाग दिसून येत आहे.

# खा. डॉ. श्रीकांत शिंदे यांचा २९ मे रोजी बीड जिल्ह्यात शिवसंवाद दौरा!

## सर्व पदाधिकारी-शिवसैनिकांनी आवर्जून उपस्थित राहावे-जगताप, मुळूक, गलधर

बीड ।प्रतिनिधी

राज्यभरात शिवसेना पक्ष संघटन अधिक मजबूत करण्यासाठी संसदरत्न डॉ श्रीकांतजी शिंदे साहेब यांनी महाराष्ट्रभर शिवसंवाद दौऱ्याची कंबर कसली असून दि. २९ मे २०२६ रोजी त्यांचा महत्त्वपूर्ण बीड जिल्हा दौरा पार पडणार आहे. या दौऱ्यात बीड जिल्ह्यातील विविध मतदारसंघांमध्ये तळागाळातील शिवसैनिक, पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधला जाणार असून पक्ष संघटन बळकट करण्यावर विशेष भर दिला जाणार आहे. विशेष म्हणजे या बैठकींसाठी शिवसेना पक्षातील विविध मंत्री व वरिष्ठ नेते देखील उपस्थित राहणार आहेत.

दौऱ्याची सुरुवात सकाळी १० वाजता केज शहरातील हॉटेल अर्जुन पॅलेस येथे होणाऱ्या केज-परळी मतदारसंघाच्या बैठकीने होणार आहे. त्यानंतर दुपारी १ वाजता हॉटेल नीलकमल येथे बीड-माजलगाव मतदारसंघाची बैठक पार पडेल तर दिवसातील शेवटची बैठक सायंकाळी ५ वाजता पाटोदा येथे आष्टी-गेवराई मतदारसंघासाठी आयोजित करण्यात आली आहे. या बैठकींमध्ये विधानसभा क्षेत्रनिहाय संघटनात्मक आढावा, तालुकानिहाय माहिती, जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक नियोजन, संभाव्य उमेदवारांबाबत चर्चा, ड.ए.ज. नेमणुका, इङ- यादी व प्रशिक्षण नियोजन यांसारख्या महत्त्वपूर्ण विषयांवर सखोल चर्चा होणार आहे.



या बैठकींसाठी शिवसेना, महिला

पान २ वर...

# ऊस आणि कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांची केंद्र सरकारकडून दखल - मुख्यमंत्र्यांची माहिती

## केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांच्याशी राज्याच्या प्रतिनिधींची सविस्तर चर्चा

नवी दिल्ली ।प्रतिनिधी

साखरेच्या किमान आधारभूत किंमतीत वाढ करणे,इथेनॉल कोटा वाढवणे, कर्ज पुनर्गठन, व्याज सवलत, शेतकऱ्यांकडून थेट कांदा खरेदी, शेतीमालाचे ग्रेडिंग, कांदा बियाण्यांवर अधिभार आदी शेतकऱ्यांच्या महत्त्वाच्या प्रश्नांबाबत केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांच्यासोबत आज झालेल्या सकारात्मक चर्चेमुळे राज्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असून याबाबत लवकरच केंद्र सरकार अनुकूल निर्णय घेणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.



नवी दिल्ली येथे आज महाराष्ट्रातील साखर कारखानदारी, ऊस आणि कांदा उत्पादक शेतकरी यांच्या विविध अडचणींसंदर्भात श्री. शाह यांच्यासोबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह संबंधित मंत्री आणि विविध संस्थांच्या प्रतिनिधींची सकारात्मक चर्चा झाली.

केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान आणि केंद्रीय सार्वजनिक वितरण मंत्री प्रल्हाद जोशी हेही या बैठकीस उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, जलसंपदा मंत्री गिरीष महाजन, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, पणन मंत्री जयकुमार रावल, शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्र राजे भोसले, खा. धनंजय महाडिक, आ. दिलीप वळसे-पाटील, जयंत पाटील, डॉ राहुल आहेर, विनय कोरे, राहुल कुल, अभिमन्यु पवार, विनय कोरे, राजेश टोपे, राष्ट्रीय

पान २ वर...

# दारु वाहतुक करणाऱ्या स्विफ्ट कारसह एकूण ६ लाखाचा मुद्देमाल गेवराई पोलीसांनी केला जप्त

बीड ।प्रतिनिधी

अवैध धंद्यावर कारवाई करणारे पथकास गेवराई शहरातून अवैधरित्या देशी-विदेशी दारूची चोरटी वाहतूक करत असल्याची माहिती मिळालेवरून पथकाने सावता नगर चौकात केलेल्या कारवाईत ईसम नामे राम अश्रुबा कदम, वय-४५ वर्षे, रा.पंचायत समिती रोड, भिमनगर, ता.गेवराई, जि.बीड हा त्याच्या ताब्यातील स्विफ्ट डिझायर कार क्रमांक चक१२टक्ष७९६४ मध्ये देशी विदेशी दारूची चोरटी वाहतूक करत असतांना मिळून आला. सदर कारमध्ये एकूण ८०००/-रू देशी विदेशी दारू मिळून आली. देशी-विदेशी दारूसह स्विफ्ट डिझायर कार असा एकूण



६,०८,०००/-रू चा मुद्देमाल जप् करण्यात आला असून आरोपी विरूध्द पोलीस ठाणे गेवराई येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास चालू आहे.

नवतीत काँवत, पोलीस अधीक्षक बीड यांनी आगामी सण-उत्सवाच्या अनुषंगाने बीड जिल्ह्यातील अवैध धंद्यावर विरूध्द कठोर कारवाई करण्याबाबत सुचना दिल्या होत्या. त्या अनुषंगाने पोलीस निरीक्षक किशोर पवार यांनी पथक तयार करून अवैध धंद्याविरूध्द कारावईची धंडक मोहीम उघडली आहे.सदरची कारवाई नवतीत काँवत, पोलीस अधीक्षक, बीड, श्रीमती

पान २ वर...

# शिवाजीनगर पोलिसांचा ऑनलाईन चक्री जुगार अड्ड्यावर छापा

## ५५ हजारांच्या मुद्देमालासह एकाला अटक

बीड ।प्रतिनिधी

दिनांक २६/०५/२०२६ रोजी शिवाजीनगर पोलीस ठाणे हद्दीतील नगर रोड भागातील बालेपीर परिसरात सुरू असलेल्या एका अवैध ऑनलाईन चक्री जुगार अड्ड्यावर शिवाजीनगर पोलिसांनी अचानक छापा टाकला. या कारवाईत पोलिसांनी एका आरोपीला रंगेहात पकडले असून, त्याच्याकडून कॉम्प्युटर आणि रोख रक्कमेसह एकूण ५५.१५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे

पान २ वर...



# बीड जिल्हा भाजपच्या प्रशिक्षण वर्गाचा थाटात समारोप

## सामान्य माणसाचे हित डोळ्यासमोर ठेवूनच केंद्र व राज्य सरकार विकासाच्या योजना यशस्वीपणे राबवत आहे - ना. पंकजाताई मुंडे

मुंबई ।प्रतिनिधी

गरीब व गरिबीची जाण असणारे पंतप्रधान आपल्या देशाला लाभले आहेत आणि याचमुळे केंद्र व राज्य सरकार सामान्य माणसाला समोर ठेवून आज विकासाच्या अनेक योजना यशस्वीपणे राबवित आहे. समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत विकासाचे लाभ पोहोचले पाहिजेत यासाठी त्यांचे प्रयत्न आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी व राज्यात देवेंद्र फडणवीस सारखे कुशल नेते लाभले असल्यामुळे पक्षाला फार मोठे यश मिळाले आहे अशा शब्दांत राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी आज पदाधिकाऱ्यांशी संवाद साधला.

पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान अंतर्गत बीड जिल्हा भाजपच्या दोन दिवसीय प्रशिक्षण वर्गाचा समारोप

पान २ वर...




### ताईंनी घेतली पदाधिकाऱ्यांची काळजी

प्रशिक्षण वर्गास दोन्ही दिवशी ना. पंकजाताई मुंडे व डॉ.प्रितमताई मुंडे पूर्णवेळ उपस्थित होत्या, त्यामुळे पदाधिकाऱ्यांमध्ये मोठा उत्साह होता. शिबीरात सर्वांची चहा, नाश्ता, निवास, भोजनाची व्यवस्था योग्य झाली की नाही, याची त्यांनी स्वतः आस्थेवाईकपणे प्रत्येकाला बोलून चौकशी केली. त्यांच्यासमवेतच नाश्ता, भोजन केले. सत्राचा समारोप झाल्यानंतर सर्व सुखरूप पोहोचा, सावकाश जा असा काळजीचा सल्लाही दिला.आ. नमिता मुंदडा, माजी आमदार बदामराव पंडित, प्रवक्ते नवनाथ बन, राम कुलकर्णी, बाळदादा पवार, जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, नवनाथ शिराळे, माधव निर्मळ, संतोष हंगे, विजय गोल्हार यांसह जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकारी याप्रसंगी उपस्थित होते.

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ
सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5

संपादकीय....

# राज्याच्या राजकारणात नवी उलथापालथ?

नवीन १६ विधान परिषद आमदारांमुळे महायुतीला विधान परिषदेत मजबूत बहुमत मिळेल. पावसाळी अधिवेशनापूर्वी शपथ घेतल्यानंतर विधेयके पास करणे सोपे होईल. मविआसाठी पुनरुज्जीवनाची ही आयती संधी आहे. स्थानिक राजकारणाचे भविष्य यामुळे ठरणार आहे.

महाराष्ट्राच्या राजकीय पटावर पुन्हा एकदा विधान परिषद निवडणुकीचे ढग दाटले आहेत. ही निवडणूक केवळ १६ जागा भरण्याची नाही, तर महाराष्ट्राच्या स्थानिक राजकारणाचे संतुलन, विकासाचा प्राधान्यक्रम आणि सत्ताधारी महायुती विरुद्ध विरोधक महाविकास आघाडी यांच्यातील शक्तिपरीक्षण ठरणारी आहे. दीर्घकाळ रिक्त जागांमुळे शेतकरी, सहकार, शहरी विकास आणि ग्रामीण समस्या विधान परिषदेत प्रभावीपणे मांडल्या गेल्या नाहीत. आता नवीन आमदारांकडून मोठ्या अपेक्षा आहेत.

विधान परिषद ही राज्याची वरिष्ठ सभा असून, येथील सदस्य अप्रत्यक्ष निवडणुकीद्वारे निवडले जातात. राज्यातील ७८ सदस्यांपैकी २२ सदस्य स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतदारसंघातून निवडले जातात. यापैकी १६ जागा साडेचार वर्षांहून अधिक काळ रिक्त होत्या. आता निवडणूक आयोगाने १८ मे २०२६ रोजी या १६ जागांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे.

इतका उशीर का झाला?

कोरोना महामारी, ओबीसी आरक्षण विवाद, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लांबणीवर पडणे आणि न्यायालयीन प्रक्रिया यामुळे या जागा २०२२ पासून रिक्त राहिल्या. अनेक आमदारांचा कार्यकाळ २०२२ मध्ये संपला, तर काही २०२४ मध्ये. यामुळे जिल्हा परिषद, महापालिका, नगरपालिका आणि पंचायत समित्यांच्या विकासकामांना प्रतिनिधित्व मिळाले नाही. २०२५-२६ मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पूर्ण झाल्याने आता ७५ टक्के मतदार संख्या पूर्ण होऊन निवडणूक शक्य झाली आहे.

मतदारसंघ आणि मतदार संख्या

या निवडणुकीत सोलापूर (५९५), अहमदनगर (४६१), ठाणे-पालघर (१०५४), जळगाव (५२६), सांगली-सातारा (८५३), नांदेड (४३२), यवतमाळ (४०५), पुणे (७९८), भंडारा-गोंदिया (४५७), रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग (९४७), नाशिक (५८१), वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली (९७७), अमरावती (४५३), धाराशिव-लातूर-बीड (१०५१), परभणी-हिंगोली (४६८), छत्रपती संभाजी नगर-जालना (५८०) आणि नागपूर (७६१) या मतदारसंघांचा समावेश आहे. मतदार हे महापालिका नगरसेवक, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सभापती इत्यादी आहेत.

भूतकाळातील चित्र

या मतदारसंघांत पूर्वी राष्ट्रवादी, भाजप, शिवसेना आणि काँग्रेस यांच्यात कडवी लढत झाली. सोलापूरमध्ये प्रशांत प्रभाकर परिचारक (भाजप समर्थित) यांनी शेतकरी मुद्द्यांवर सक्रिय भूमिका घेतली. पुण्यात अनिल शिवाजीराव भोसले (राष्ट्रवादी) यांचा काळ सहकार आणि शहरी विकासाशी जोडला गेला, मात्र घोटाळ्यांच्या चर्चेने प्रभावित झाला. अहमदनगरमध्ये अरुणकाका जगताप, जळगावमध्ये चंदूभाई पटेल, अमरावतीमध्ये प्रवीण पोटे यांनी दीर्घकाळ प्रतिनिधित्व केले. मागील निवडणुकांत ९० टक्क्यांहून अधिक मतदान आणि काही ठिकाणी क्रॉस व्होटिंगमुळे अनपेक्षित निकाल लागले होते.

# जलजीवन मिशन, जलसंधारण आणि नदीजोड प्रकल्पांच्या माध्यमातून

## महाराष्ट्र दुष्काळमुक्त करण्यासाठी प्रयत्न - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## केंद्रीय जलशक्ती मंत्र्यांसोबत राज्याची सकारात्मक चर्चा

नवी दिल्ली ।प्रतिनिधी

केंद्र सरकारचे जलजीवन मिशन, प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजना, जलसंचय जनभागीदारी तसेच राज्यातील विविध जलसंधारण आणि सिंचन योजनांच्या कामांना सर्वोच्च प्राधान्य देऊन महाराष्ट्र दुष्काळमुक्त करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. केंद्रीय जलसिंचन मंत्री सी. आर. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आज याबाबत झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत महाराष्ट्राकडून व्यक्त केलेल्या अपेक्षांना केंद्र सरकारकडून सकारात्मक प्रतिसाद देण्यात आला.




सीजीओ कॉम्प्लेक्समधील पंडित दीनदयाळ अंत्योदय भवन येथे आयोजित या बैठकीस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रापवार, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील,

केंद्र सरकारच्या जलसंपदा विभागाचे सचिव व्ही. एल. कांथाराव, पेयजल आणि स्वच्छता विभागाचे सचिव अशोक के. के. मीना,केंद्रीय जल आयोगाचे अध्यक्ष अनुपम प्रसाद, नॅशनल वॉटर मिशनच्या व्यवस्थापकीय संचालक अर्चना वर्मा, मुख्यमंत्री कार्यालयाचे अतिरिक्त मुख्य सचिव लोकेश चंद्रा, पाणीपुरवठा विभागाचे प्रधान सचिव पराग जैन,ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, उपमुख्यमंत्री कार्यालयाचे सचिव नवीन सोना, मुख्यमंत्र्यांचे सल्लागार श्रीराम वेदिरे , जलसंधारण विभागाचे सचिव जितेंद्र पापळकर, जलसंपदा विभागाचे सचिव संजय बेलसरे आदी यावेळी उपस्थित होते.

प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेंर्गत राज्यात सुरू असलेल्या सिंचन प्रकल्पांचा या बैठकीत आढावा घेण्यात आला. अपूर्ण प्रकल्प पूर्ण करण्यासाठी जादा निधीची मागणी करण्यात आली. त्यास केंद्राकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला. जलजीवन मिशनमधील उर्वरित प्रकल्प पूर्ण करण्यासाठी केंद्र सरकारनकडून मोठ्या प्रमाणावर आर्थिक मदत देण्याचे आश्वासन या बैठकीत देण्यात आले. राज्यातील ७५% पेक्षा जास्त पूर्ण झालेल्या योजना, तसेच ५०% ते ७५% दरम्यान पूर्ण झालेल्या योजनांना प्राधान्याने निधी दिला जाणार आहे. या पाईपलाईन आणि पाणी पायाभूत सुविधांच्या योजनांना गती देऊन त्या पूर्ण करण्यासाठी केंद्र सरकारकडून अंदाजे ६,८०० कोटी रुपये मिळण्याची अपेक्षा आहे. पूर्ण झालेल्या पाणीपुरवठा योजनांचे स्थानिक गावे, ग्रामपंचायती, तालुके आणि जिल्हा पातळीवर अचूक प्रमाणीकरण करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी बैठकीत सांगितले.राज्य आणि केंद्र अधिकाऱ्यांनी ९०% योजनांचा सविस्तर आढावा घेतला आहे. सद्यस्थितीत आढळून आलेल्या त्रुटी दूर केल्या जात आहेत, जलस्रोतांचे बळकटीकरण केले जात आहे आणि पुढील कामे दर्जेदार होतील याची कडक खबरदारी घेतली जात असल्याचे मुख्यमंत्र्यांनी यावेळी स्पष्ट केले.

जल जीवन मिशन हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे अत्यंत महत्त्वाकांक्षी स्वप्न असून ते पूर्ण करण्यासाठी महाराष्ट्र सर्वतोपरी प्रयत्न करेल. केंद्र सरकारकडून अधिकाधिक सहकार्य अपेक्षित असून त्यानंतर

प्रलंबित बाबी मार्गी लावून योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येईल, असे सांगून मुख्यमंत्री म्हणाले की, महाराष्ट्रात देशातील सुमारे ४० टक्के धरणे असूनही राज्यातील जवळपास ५० टक्के भाग दुष्काळग्रस्त आहे. त्यावर जलसंधारण आणि लोकसहभाग हाच दीर्घकालीन उपाय आहे. 'जलतारा'सारख्या उपक्रमांना अधिक व्यापक स्वरूप देण्यावर भर देण्यात येणार असून सीएसआर आणि मनरेगा निधीच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर जलसंधारणाची कामे राबवली जातील.

जलताराचे स्ट्रक्चर्स वाढवण्यावर भर देण्यास सांगितले आहे. 'जलयुक्त शिवार'च्या माध्यमातून आधीच काम सुरू असून, कन्व्हर्जन्स करून हे काम निश्चितपणे पूर्ण केले जाईल, असे या बैठकीत स्पष्ट करण्यात आले.आंतरराज्यीय नदीजोड प्रकल्पांमध्ये राज्यांमध्ये सहमती होण्यास वेळ लागतो, असे प्रधानमंत्र्यांचे मत असल्याने राज्यांतर्गत असलेल्या नदीजोड प्रकल्पांना प्राधान्य दिले जावे, असे निर्देश देण्यात आले आहेत.राष्ट्रीय जल आयोगाच्या मंजुरीनंतर केंद्र सरकारकडून या प्रकल्पांच्या निधी वाटपासंदर्भात पुढील सकारात्मक चर्चा होईल, असे या बैठकीत सांगण्यात आले. नदीजोड प्रकल्पांच्या माध्यमातून महाराष्ट्राचे भाग्य बदलू शकते, अशी खात्री व्यक्त करून मुख्यमंत्री म्हणाले, वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प आणि पश्चिम वाहिनी नद्यांमधून मराठवाडा व उत्तर महाराष्ट्राकडे पाणी वळविण्याचे प्रकल्प पूर्ण झाल्यास राज्यातील सध्याचा ५२ टक्के दुष्काळग्रस्त भाग दुष्काळमुक्त होऊ शकतो. वैनगंगा-नळगंगा प्रकल्पातून दरवर्षी समुद्रात जाणाऱ्या १०० टीएमसी पाण्यापैकी ६२ टीएमसी पाणी वळविण्याचे नियोजन आहे. तसेच उल्हास खोऱ्यामधील ३५० टीएमसी पाण्यापैकी ७५ टीएमसी पाणी मराठवाड्याकडे वळविण्याची योजना आहे.या प्रकल्पांसाठी आवश्यक सर्व अभ्यास आणि अहवाल पूर्ण झाले असून केंद्रीय जल आयोगाची मंजुरी मिळाल्यानंतर निविदा प्रक्रिया सुरू करता येईल. या मोठ्या प्रकल्पांसाठी केंद्र सरकारच्या मदतीची आवश्यकता असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

बैठकीत 'मेगा रिचार्ज' प्रकल्पाचाही उल्लेख करण्यात आला. महाराष्ट्र आणि मध्यप्रदेश सरकारदरम्यान या संदर्भात करार झाला असून भूजल पुनर्भरणाच्या दृष्टीने हा प्रकल्प देशासाठी आदर्श ठरू शकतो, असे मुख्यमंत्री म्हणाले.

आढाव्यानंतर केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांनी जलसंधारण आणि लोकसहभागाच्या माध्यमातून जलक्रांती घडवून आणण्याचे आवाहन केले. त्यांनी सांगितले की, नागपूर आणि विदर्भातील शेतकरी आत्महत्यांची गंभीर परिस्थिती लक्षात घेता पारंपरिक धरणे आणि कालव्यांसोबतच 'जलसंचय आणि जनभागीदारी'वर आधारित जलसंधारण मॉडेल अधिक प्रभावी ठरत आहे.

त्यांनी महाराष्ट्रातील 'जलतारा' योजनेचे विशेष कौतुक करत सांगितले की, अवघ्या ४ ते ५ हजार रुपयांत उभारल्या जाणाऱ्या या छोट्या स्ट्रक्चरमुळे एका हंगामात एका एकरात ३ ते ४ लाख लिटर पाणी जमिनीत मुरवता येते. शेतकऱ्यांनी आपल्या शेतात १ ते २ जलतारा स्ट्रक्चर उभारल्यास भूजल पातळीत तात्काळ सुधारणा दिसून येते, असे त्यांनी नमूद केले.

श्री पाटील यांनी सांगितले की, सप्टेंबर २०२४ पासून सुरू झालेल्या मोहिमेत ३१ मे २०२५ पर्यंत १० लाख स्ट्रक्चर्सचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते; मात्र प्रत्यक्षात २७.५० लाख स्ट्रक्चर्स उभारण्यात आली. तसेच ३१ मे २०२६ पर्यंत १ कोटींचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून आजपर्यंत १ कोटी २६ लाख कामे पूर्ण झाली आहेत. ३१ मेपर्यंत हा आकडा १.५ कोटींवर नेण्याचा मानस असल्याचे त्यांनी सांगितले.त्यांनी सांगितले की, मनरेगा अंतर्गत डार्क झोन भागात ६५ टक्के निधी जलसंधारणावर खर्च करण्याची तरतूद करण्यात आली असून सेमी-क्रिटिकल भागात ४० टक्के आणि इतर भागात ३० टक्के निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. गुजरातमधील बनासकांठा जिल्ह्यात लोकसहभागातून ३० हजार स्ट्रक्चर्स उभारल्यानंतर भूजल पातळीत मोठी सुधारणा झाल्याचा अनुभव त्यांनी मांडला.मुक्ताईनगर येथे सीएसआर फंडातून १२ कोटी रुपये खर्च करून जलसंधारणाची कामे करण्यात आली असून त्यामुळे तीव्र पाणीटंचाई दूर झाल्याचे त्यांनी सांगितले. 'जल जीवन, जल संचय, जन भागीदारी' ही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची संकल्पना लोकचळवळीत रूपांतरित झाली पाहिजे, असे आवाहनही त्यांनी केले.

हर घर जल योजनेमुळे देशातील महिलांना मोठा दिलासा मिळाला आहे. पूर्वी पाणी आणण्यासाठी महिलांचा मोठा वेळ खर्च होत होता; मात्र आता घराघरांत स्वच्छ पाणी उपलब्ध होत असल्याने आरोग्य सुधारत असून आरोग्य खर्चातही मोठी बचत होत आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी प्रत्येक घरापर्यंत अखंड पाणीपुरवठा सुनिश्चित करण्यासाठी गांभीर्याने लक्ष द्यावे, असे निर्देश त्यांनी दिले.जी रामजी योजनेत जलसंधारणाच्या कामांना अधिक महत्त्व देण्याचा आग्रह राज्याकडून धरण्यात आला असून डार्क झोनमध्ये ( भूजल पातळी अत्यंत खालावलेले क्षेत्र ) असणाऱ्या गावांना ६५ टक्के एवढा निधी तर सेमी डार्क झोनमधील गावांना ४५ टक्के निधी तर उर्वरित गावांना ३० टक्के निधी मिळणार आहे. प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजनेअंतर्गत राज्याला मिळालेल्या विविध योजनांचा आढावा घेण्यात आला.या योजनांसाठी आवश्यक असलेल्या अधिकच्या निधीची मागणी करण्यात आली असून, त्याबाबत सकारात्मक चर्चा झाली.

## जाहीर प्रगटन

### तहसीलदार बीड यांचे न्यायालयात

जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. ४६/२०२६

**एजाज मैनुद्दीन शेख** विरूध्द **ग्रामपंचायत कार्यालय, पाली**

पहा

१. एजाज मैनुद्दीन शेख

रा.पाली ता.जि.बीड

उपरोक्त प्रमाणे जन्म मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असुन जन्म धारक **शेख नसरीन शेख मैनुद्दीन** यांचा दिनांक **२२.०६.१९८५** रोजी जन्म झालेला असुन त्यांचे जन्म नोंद जन्म मृत्यू नोंदवहीमध्ये घेणे बाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरू आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय, न.प.कार्यालयास पाली ता.बीड येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेवून जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे पाली ता.जि.बीड येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेवून जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दि.१०.०३.२०२६ रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिले.

सदर प्रकरणात पुढील तारिख १०.०४.२०२६ ही आहे.

**स्वाक्षरित/-**

**तहसीलदार, बीड**

**तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी घनसावंगी यांचे कार्यालय, घनसावंगी**

**जा.क्र.२०२६/सेतु/कावि-३३३ दि.२२.०९.२०२५**

## जाहिर प्रगटन

अर्जदार **श्रीमती सुनिता बबन जाधव, रा.रांजणी, ता.घनसावंगी, जि.जालना** यांनी यांच्या **स्वत**:च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | सुनिता बबन जाधव | स्वतः | १२.१०.१९८२ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्क्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**

**तालुका दंडाधिकारी,**

**घनसावंगी**

# बीड येथे ३१ मे रोजी एमपीएससीची पूर्व परीक्षा

## ६ परीक्षा केंद्रावर १५३० उमेदवार देणार परीक्षा

बीड ।प्रतिनिधी

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून घेतली जाणारी महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित गट-अ आणि गट-ब संयुक्त पूर्व परीक्षा-२०२६ रविवार दि.३१ मे २०२६ रोजी बीड शहरातील ६ उपकेंद्रावर पार पडणार आहे. या परीक्षेसाठी जिल्ह्यातून एकूण १ हजार ५३० उमेदवार बसलेले आहेत. सर्व परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ अन्वये मनाई आदेश लागू करण्यात आला आहे. अशी माहिती निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी दिली आहे.

परीक्षा काळात कोणताही अनुचित प्रकार घडू नये आणि कायदा- सुव्यवस्था राखली जावी, यासाठी सर्व केंद्रांवर कडक पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षा पारदर्शक आणि सुरक्षित वातावरणात पार पाडण्यासाठी प्रशासनाने उमेदवारासाठी कडक नियमावली जाहीर केली आहे. यामध्ये उमेदवार परीक्षा केंद्रावर मोबाईल, पेजर, कॅल्क्युलेटर, इतर इलेक्ट्रॉनिक वस्तू किंवा अभ्यासाचे साहित्य सोबत आणू शकणार नाहीत. आयोगाच्या सूचनेनुसार उमेदवारांना जेवणाचा डब्बा, अल्पोपहार आणि पाण्याची बॉटल सोबत बाळगण्याची मुभा असेल. पहिल्या आणि दुसऱ्या पेपरच्या मधल्या वेळेत उमेदवारांना परीक्षा उपकेंद्राच्या बाहेर जाण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. उमेदवारांनी प्रवेशपत्रासोबत स्वतःचे आधारकार्ड, निवडणूक ओळखपत्र, पासपोर्ट किंवा ड्रायव्हिंग लायसन्स यापैकी कोणतेही एक मूळ ओळखपत्र आणि त्याची एक छायांकित प्रत सोबत आणणे बंधनकारक आहे. उमेदवारांना पहिल्या पेपरसाठी सकाळी ०८:३० वाजेपूर्वी, तर दुसऱ्या पेपरसाठी दुपारी ०१:३० वाजेपूर्वी परीक्षा उपकेंद्रावर उपस्थित राहावे लागेल. परीक्षा सुरू झाल्यानंतर येणाऱ्या उमेदवारांना कोणत्याही कारणास्तव प्रवेश दिला जाणार नाही, असेही प्रशासनाकडून कळविण्यात आले आहे.

पान १ वरून...

**जनगणनेच्या कामाचा...**

? असा संतप्त सवाल आता राज्यभरातून उपस्थित होत आहे.

या घटनांमुळे जनगणना प्रक्रियेच्या नियोजनावरही प्रश्न उपस्थित होत असून प्रशासनाने तातडीने वास्तव परिस्थितीचा आढावा घेऊन शिक्षकांसाठी स्वतंत्र सुरक्षा यंत्रणा, विमा संरक्षण, प्रवास भत्ता आणि सुरक्षित कामकाजाची अंमलबजावणी करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे. अन्यथा शिक्षकांमधील असंतोष आणखी तीव्र होण्याची चिन्हे दिसत आहेत.

**ऊस आणि कांदा उत्पादक....**

सहकारी साखर महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील, राज्य सहकारी साखर महासंघाचे जयप्रकाश दांडेगावकर, रणजितसिंह निंबाळकर, मुख्यमंत्री कार्यालयाचे अतिरिक्त मुख्य सचिव लोकेश चंद्र, सुहकार व पणन विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, सहकार आयुक्त दीपक तावरे, कृषी आयुक्त सुरज मांढरे , साखर आयुक्त संजय कोलते आधी या बैठकीस उपस्थित होते.

या बैठकीत झालेल्या सविस्तर चर्चेतील मुद्द्यांबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माहिती दिली. साखरेच्या प्रश्नांवर केंद्रीय सहकार मंत्र्यांसोबत अत्यंत सकारात्मक चर्चा झाल्याबाबत समाधान व्यक्त करून मुख्यमंत्री म्हणाले,

साखरेची किमान आधारभूत किंमत

वाढवणे गरजेचे असल्याचे श्री. शाह यांनी मान्य केले आहे. इथेनॉलचा कोटा मोठ्या प्रमाणात वाढवण्यासाठी येत्या दोन महिन्यांत निर्णय घेण्याबाबत त्यांनी सहमती दर्शवली असून कर्ज पुनर्गठनासंदर्भात राज्य सरकारसोबत एकत्रितपणे काम करून मार्ग काढण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. त्यासह व्याज सवलतीचे (इंटरेस्ट सबव्हेंशन ) पैसे तात्काळ देण्याचे मान्य करण्यात आले करण्यात आले आहे. 'क्वेल प्राइजिंग' ( किंमत नियंत्रण) संदर्भात केंद्राने एक प्रस्ताव मागवला असून, राज्य सरकारकडून तो तयार केला आहे व लवकरच सादर केला जाईल. या प्रकल्पामुळे साखर कारखानदारीचे अनेक प्रश्न सुटण्यास मदत होईल.

कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांवरही सकारात्मक निर्णय झाले असल्याची माहिती देऊन मुख्यमंत्री म्हणाले, नाफेड आणि एनसीसीएफने सुरू केलेली कांदा खरेदी बाजारात थेट व्यापाऱ्यांकडून न होता, थेट शेतकऱ्यांकडून केली पाहिजे ही मागणी मान्य करण्यात आली आहे. २ लाख टनांऐवजी १० लाख टन कांदा खरेदी नाफेड आणि एनसीसीएफने करावी, यावर सकारात्मक निर्णय होण्याची अपेक्षा आहे.

सध्या कांद्याचे बियाणे मोठ्या प्रमाणात निर्यात होत असल्याने देशांतर्गत कांद्याला एक्सपोर्ट मार्केट उरत नाही. यासाठी कांदा बियाण्यावर मोठ्या प्रमाणात 'एक्सपोर्ट सरचार्ज' लावला पाहिजे, ही मागणी देखील मान्य करण्यात आली आहे. तसेच कांद्याचा खरेदी भाव नुकताच वाढवून १५ रुपये ८० पैसे करण्यात आला आहे. तो आणखी कसा वाढवता येईल यावर चर्चा झाली. कांद्याच्या बियाणांवर निर्बंध असले, तरी कांद्याच्या निर्यातीवर (कांदा पाठवण्यावर) कोणतीही बंदी नाही, असे या चर्चेत स्पष्ट करण्यात आले.

नाफेड किंवा एनसीसीएफमध्ये ग्रेडिंगच्या नावाखाली माल निकृष्ट दर्जाचा दाखवून खरेदी नाकारली जाते, अशी शेतकऱ्यांची तक्रार असते. यावर उपाय म्हणून आता यंत्रसामुग्रीच्या माध्यमातून ग्रेडिंग केले जाईल, ज्यामुळे शेतकऱ्यांना योग्य न्याय मिळणार असल्याबाबत समाधान व्यक्त करून मुख्यमंत्री म्हणाले,

आंबा आणि हापूस आंब्यासंदर्भात निर्माण झालेल्या प्रश्नांबाबत केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांनाही यावेळी निवेदन देण्यात आले. विमा कंपन्यांनी घातलेल्या जाचक अटींमध्ये बदल केल्यास आंबा उत्पादकांना मोठा दिलासा मिळू शकतो, हे त्यांच्या निदर्शनास आणून दिले.यावर केंद्रीय मंत्र्यांनी विमा कंपन्यांची बैठक घेऊन योग्य मार्ग काढण्याचे आश्वासन दिले असल्याची माहितीही मुख्यमंत्र्यांनी दिली .

**शिवाजीनगर पोलिसांचा....**

पथक नगर रोड परिसरात पेट्रोलिंग करत असताना. एका गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की, नगर रोडवरील मुज्जू कुशन वर्कच्या पाठीमागे. एका पत्र्याच्या शेडसमोर सार्वजनिक ठिकाणी लोकांकडून पैसे घेऊन ऑनलाईन चक्री नावाचा जुगार खेळवला जात आहे. या माहितीच्या आधारे पोलिसांनी दोन पंचांसमक्ष सायंकाळी ७:४० वाजताच्या सुमारास सदर ठिकाणी छापा टाकला. पोलिसांना पाहताच तिथे

पान १ वरून...

जुगार खेळणारे इतर लोक पळून गेले. मात्र पोलिसांनी एका इसमाला जागेवरच ताब्यात घेतले. आरोपी आणि जप्त मुद्देमाल ताब्यात घेतलेल्या व्यक्तीचे नाव गणेश हरीशचंद्र लाटे वय ३६ वर्षे, रा. बेलुरा. ता. जि. बीड असे आहे. तो लोकांकडून पैसे घेऊन कॉम्प्युटरवर ऑनलाईन जुगार खेळत आणि खेळवत असल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी त्याच्याकडून कॉम्प्युटर साहित्य आणि रोख रक्कम असा एकूण ५५१५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी आरोपीविरुद्ध शिवाजीनगर पोलीस ठाण्यात महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरील कामगिरी प्रभारी पोलीस अधीक्षक, अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. व्यंकटराम, पोलीस निरीक्षक श्री. शितलकुमार बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक फौजदार संतोष राऊत. पोलीस हवालदार शिवदास घोलप, रवींद्र राघव. ज्ञानेश्वर मराडे. आनंद गिरी. सचिन आगलावे आणि अनिल घटमळ यांच्या पथकाने केली.

**खा. डॉ. श्रीकांत ....**

आघाडी, युवा सेना, अल्पसंख्यांक आघाडी, बांधकाम कामगार सेना, अध्यात्मिक आघाडी, शेतकरी सेना, ओबीसी व्ही जे एन टी सेल, डॉक्टर सेल, विधी सेल, एसटी कामगार सेना, वाहतूक सेना, शिव उद्योग सेना आणि वैद्यकीय मदत कक्ष यांसह सर्व अंगीकृत संघटनांच्या आजी-माजी पदाधिकाऱ्यांनी, लोकप्रतिनिधींनी, शाखाप्रमुख, बूथप्रमुख आणि शिवसैनिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, जिल्हाप्रमुख सचिन भैय्या मुळूक आणि जिल्हाप्रमुख स्वप्नील भैय्या गळधर यांनी केले आहे.

**दारू वाहतुक करणाऱ्या ....**

चेतना तीडके, अपर पोलीस अधीक्षक, बीड, अनिल कटके, उप विभागीय पोलीस अधीकारी उप विभाग गेवराई यांच्या मार्गदर्शनाखाली किशोर पवार, पोलीस निरीक्षक गेवराई, सपोनि. संतोष जंजाळ, पोह आशोक हंबर्डे, पोकॉ धिरज खांडेकर, पोकॉ महादेव कदम, पोकॉ रामराजे काकडे व होमागार्ड ढाकणे यांनी सहभाग घेतला.

**बीड जिल्हा भाजपच्या....**


आज रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला, समारोपाच्या शेवटच्या सत्रात केंद्र आणि राज्य सरकारच्या जन कल्याणकारी योजना या विषयावर पदाधिकाऱ्यांशी संवाद साधताना त्या बोलत होत्या.केंद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकार सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, महिला आणि तरूणांच्या हिताच्या अनेक योजना यशस्वीपणे राबवित असल्याचे सांगत विविध कल्याणकारी योजनांचा लेखाजोखा आपल्या भाषणात मांडला.

पुढे बोलतांना त्या म्हणाल्या, मी लहानपणापासूनच भाजपच्या संस्कारात वाढले. माझ्या नावातच भाजपचे कमळ आहे. लोकनेते मुंडे साहेबांमुळे अटलजी, आडवाणीजी सारख्या नेत्यांना जवळून अनुभवता आले. मुंडे साहेब मला सगळीकडे घेऊन जायचे, त्यांनी पक्षाला वाडी, वस्ती, तांड्यापर्यंत घेऊन जाण्यासाठी जे कष्ट घेतले त्यामुळे आज चांगले दिवस आपण पहात आहोत. मुंडे साहेबांनी जे स्वप्न पाहिले होते, त्या स्वप्नांना सरकारी योजनांच्या स्वरूपात मी आणले. हे काम माझ्या एकट्याचे नव्हते तर पक्ष आणि नेतृत्व माझ्या मागे उभे असल्याने हे शक्य झाले. जलयुक्त शिवार, मुख्यमंत्री ग्रामसडक, बचतगटांना शुन्य टक्के दराने कर्ज अशा कितीतरी योजना चांगल्या रितीने राबवू शकले.

मोदींचा विचार जाती धर्माच्या पलिकडे

पंतप्रधान मोदी यांनी जातीधर्माच्या पलिकडे जाऊन सामान्य माणसाचा विचार केला.सामान्यांच्या जीवनात आर्थिक आणि सामाजिक सुरक्षा निर्माण करण्याचे काम त्यांनी केले. प्रधानमंत्री आवास योजना, जल जीवन मिशन, आयुष्मान भारत, उज्ज्वला योजना, पीएम किसान सन्मान योजना, मोफत अन्न धान्य अशा कितीतरी योजना सांगता येतील,ज्यात गरीबाचा विचार केला आहे. मोदीजी, देवेंद्रजी सारखे कुशल नेतृत्व लाभल्याने पक्षाला आज फार मोठे यश मिळाले आहे. त्यांच्या संस्कारातून पक्षाला भविष्यात आणखी मजबूत करण्याचा संकल्प आपण सर्वजण करूया असे आवाहन याप्रसंगी केले.

आजच्या सत्रात कार्यपद्धती या विषयावर माजी खासदार डॉ.प्रितमताई मुंडे यांनी विस्तृत मार्गदर्शन केले.भारतीय जनता पक्ष हा कार्यकर्ता आधारित आणि विचारधारेवर चालणारा तत्वनिष्ठ पक्ष आहे. आपला पक्ष एका विशिष्ट 'कार्यपद्धतीने' वाटचाल करतो आहे. संघटन,संपर्क, जनभावना आणि पक्षशिस्तीस अनुरूप आपली कार्यपद्धती असून याचा अवलंब सर्वांनी करावा असे आवाहन त्यांनी केले.




# प. पू. श्रीमद् काशी ज्ञानसिंहासनाधीश्वर श्रीश्रीश्री १००८ जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांच्या पावन उपस्थितीत

अकोला ।प्रतिनिधी

ज्येष्ठ अधिक मासानिमित्त प. पू. श्रीमद् काशी ज्ञानसिंहासनाधीश्वर श्रीश्रीश्री १००८ जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांच्या पावन उपस्थितीत भव्य धर्मसभा, दर्शन सोहळा व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. हा धार्मिक व आध्यात्मिक सोहळा दिनांक ३१ मे २०२६ रोजी रविवार सायंकाळी ६.३० वाजता राजेश्वर गुरु पंचाक्षर जंगम मठ संस्थान माळीपुर अकोला येथे मोठया उत्साहात संपन्न होणार आहे.

या कार्यक्रमामुळे माळीपुर अकोला बालापूर शहरासह परिसरातील वीरशैव लिंगायत समाजात भक्तीमय वातावरण निर्माण झाले असून भाविकांमध्ये मोठी उत्सुकता पहायला मिळत आहे. धार्मिक परंपरा, संस्कृती आणि आध्यात्मिक विचारांचा प्रसार करण्यासाठी हा सोहळा महत्वपूर्ण ठरणार आहे. कार्यक्रमाची सुरुवात सायंकाळी ६.३० वाजता धर्मसभेद्वारे मार्ग हा मुक्ती चा ग्रंथ प्रकाशन व धर्मोपदेश होणार आहेत, त्यानंतर दर्शन सोहळा चे आयोजन करण्यात आले असून महास्वामीजी भक्तांना दर्शन देतील असे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे. दर्शन सोहळयामुळे भक्तांना आध्यात्मिक आनंदाची अनुभूती मिळणार आहे.

या कार्यक्रमास विविध भागांतील मठाधीश, धर्मगुरु, समाजबांधव आणि हजारो भाविक उपस्थित राहणार असल्याची माहिती ष. ब्र. श्री १०८ सद्गुरु डॉ. विरुपाक्ष शिवाचार्य महाराज,अध्यक्ष श्री राजेश्वर पंचाक्षर जंगममठ संस्थान व श्रीक्षेत्र मन्मथधाम संस्थान व ष.ब्र. १०८ श्री. सद्गुरू सदाशिव शिवाचार्य महाराज अध्यक्ष बृहन मठ संस्थान वेळापूर यांनी दिली आहे. समस्त वीरशैव लिंगायत समाज, माळीपुर अकोला व परिसर यांच्या वतीने आयोजित या कार्यक्रमास जास्तीत जास्त भाविकांनी उपस्थित राहून धर्मलाभ घ्यावा, असे आवाहन सेवार्थी शिवा प्रोविज़न व साई फ्लाक्स सह अधिकमास अनुष्ठानचे मार्गदर्शक वेदांताचार्य ष ब्र . १०८ श्री. सद्गुरू सदाशिव शिवाचार्य महाराज अध्यक्ष बृहन मठ संस्थान वेळापूर यांनी केले आहे.

# महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि कला वैभवाचा हरियाणात ४ आणि ५ जून रोजी अविष्कार

मुंबई ।प्रतिनिधी

महाराष्ट्राची समृद्ध लोकपरंपरा, वैविध्यपूर्ण लोकसंस्कृती आणि पारंपरिक कलावैभव राष्ट्रीयस्तरावर पोहोचविण्याच्या उद्देशाने 'लोकायन लोकोत्सव' या विशेष सांस्कृतिक महोत्सवाचे हरियाणातील गुरुग्राम येथे ४ व ५ जून २०२६ रोजी आयोजन करण्यात आले आहे.




महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या सहकार्याने आणि 'लोकायन सांस्कृतिक, शैक्षणिक, सामाजिक व बहुउद्देशीय संस्था, मुंबई' यांच्या सहयोगाने हा दोन दिवसीय सांस्कृतिक सोहळा पार पडणार आहे. गुरुग्राम येथील एसजीटी युनिव्हर्सिटीत ४ व ५ जून २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता हा कार्यक्रम होईल. या लोकोत्सवामध्ये महाराष्ट्रातील विविध पारंपरिक; तसेच प्रयोगात्म लोककलांचे सादरीकरण करण्यात येणार आहे.

राज्याच्या सांस्कृतिक वैभवाची ओळख देशाच्या विविध भागांपर्यंत पोहोचविण्यासोबतच लोककला जतन व संवर्धनाचा संदेश या माध्यमातून दिला जाणार आहे. महाराष्ट्रातील विविध भागांतील नामांकित लोककलावंत यात सहभागी होऊन पारंपरिक लोकनृत्य, लोकसंगीत, पोवाडे, भारूड, गोंधळ, लावणी, दिंडी, लोकनाट्य, आदिवासी लोककला; तसेच आधुनिक प्रयोगशील लोककलांचे सादरीकरण करणार आहेत. महाराष्ट्राच्या ग्रामीण संस्कृतीतील जीवनमूल्ये, परंपरा, लोकसंवेदना आणि सामाजिक आशय या कलाविष्कारांतून प्रभावीपणे मांडण्यात येणार आहेत.

'लोकायन लोकोत्सव' हा केवळ मनोरंजनाचा कार्यक्रम नसून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचे दर्शन घडविणारा एक वैचारिक आणि कलात्मक उपक्रम ठरणार आहे. विविध कलाप्रकारांमधून भारतीय संस्कृतीतील विविधतेत एकता, सामाजिक समरसता आणि लोककलांचे जतन या मूल्यांचा संदेश प्रेक्षकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे.

सांस्कृतिक कार्य, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता मंत्री ड. आशिष शेलार, यांच्या संकल्पनेतून; तसेच सांस्कृतिक कार्य सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

महाराष्ट्रातील लोककला राष्ट्रीयस्तरावर सादर करून कलावंतांना व्यापक व्यासपीठ उपलब्ध करून देणे, नव्या पिढीला लोकपरंपरांशी जोडणे आणि सांस्कृतिक देवाणघेवाण अधिक बळकट करणे हा या महोत्सवामागील प्रमुख उद्देश आहे. गुरुग्राम येथील रसिक प्रेक्षकांना महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशाचा अनोखा अनुभव या निमित्ताने घेता येणार आहे.या सांस्कृतिक महोत्सवाला रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून महाराष्ट्राच्या लोककला आणि लोकसंस्कृतीचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनालय यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# जयभवानीच्या कु.आयशा शेख हीची महाराष्ट्र पोलीस मध्ये निवड



पालक शेख अन्सार यांचा महाविद्यालयात सत्कार

पाटोदा ।प्रतिनिधी

पाटोदा येथिल जय भवानी महाविद्यालयाची चुभंळी येथिल विद्यार्थीनी कु.शेख आयशा अन्सार हीची नुकतीस महाराष्ट्र पोलीस मध्ये निवड झाली आहे. कु. आयशा शेख ही हुशार व मेहनती विद्यार्थीनी होती. तिच्या निवडी बद्दल तिचे वडिल शेख अन्सार यांचा महाविद्यालयात प्राचार्य डॉ.विश्वास कदम यांच्या शुभहस्ते शाल पुष्पगुच्छ व श्रीफळ देवुन सत्कार करण्यात आला. या प्रसंगी प्राचार्य डॉ. विश्वास कदम यांनी कु. आयशा शेख व तिचे पालक यांचे अभिनंदन करून भविष्यासाठी शुभेच्छा! दिल्या या प्रसंगी ह.भ.प. अप्पासाहेब घुमरे, ड.नाईकनवरे,श्री.दत्ता पवार यांची विशेष उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे संचलन प्रा.डॉ.अशोक देवगुडे यांनी केले तर आभार प्रा. बाळासाहेब जोशी यांनी मानले या प्रसंगी सर्व प्राध्यापक उपस्थित होते.



बीड – त्यागमूर्ति माता रमाई भिमराव आंबेडकर यांच्या ९१ व्या स्मृति दिनी भारतीय बौध्द महासभा, समता सैनिक दल, महामानव अभिवादन ग्रुप, शाक्य संघ व बोध्द उपासक उपासिकांनी विनम्र अभिवादन केले.

# चिंचाळा येथे शॉर्टसर्किट ने घर जळून खाक ; १८ क्विंटल कापसासह संसारोपयोगी साहित्य आगीत भस्मसात

वडवणी/प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील चिंचाळा येथे शॉर्टसर्किट मुळे लागलेल्या भीषण आगीत यशवंत लक्ष्मणराव कुलकर्णी यांच्या घरातील १८ क्विंटल कापसासह सर्व जीवनाश्यक वस्तू जळून खाक झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे.या आगीत कुलकर्णी यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले असून,त्यांचे कुटुंब उघड्यावर आले आहे.

मिळालेल्या माहिती नुसार,चिंचाळा येथील रहिवासी यशवंत लक्ष्मणराव कुलकर्णी यांच्या घरात अचानक शॉर्टसर्किट झाले आणि क्षणार्धात आगीने रौद्र रूप धारण केले.आग एवढी भीषण होती की, घरातील सदस्यांना काही समजण्याच्या आतच संपूर्ण घर आगीच्या भक्ष्यस्थानी पडले. कुलकर्णी यांनी घरात साठवून ठेवलेला अंदाजे १८ क्विंटल कापूस या आगीत पूर्णपणे जळून खाक झाला आहे. कापसासोबतच घरातील अन्नधान्य,कपडे,सोन्या- चांदीचे दागिने,महत्त्वाची कागदपत्रे आणि सर्व संसारोपयोगी साहित्य जळून कोळसा झाले आहे.सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसली,तरी कुलकर्णी यांच्या आयुष्यभराची पुंजी या आगीत नष्ट झाली आहे.

या घटनेची माहिती मिळताच स्थानिक ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेत आग विझवण्याचा आटोकाट प्रयत्न केला,परंतु तोपर्यंत सर्व काही जळून खाक झाले होते. अचानक ओढवलेल्या या संकटामुळे कुलकर्णी कुटुंब पूर्णपणे कोलमडले असून,प्रशासनाने तात्काळ पंचनामा करून या पीडित कुटुंबाला आर्थिक मदत जाहीर करावी,अशी मागणी चिंचाळा ग्रामस्थांकडून केली जात आहे.



# आसारामची शिक्षा कायम; आत्मसमर्पण करण्याचे हायकोर्टाचे आदेश

जोधपूर ।प्रतिनिधी

उच्च न्यायालयाने एका अल्पवयीन मुलीवरील लैंगिक शोषण प्रकरणात मोठा निर्णय देत स्वयंघोषित अध्यात्मिक गुरू आसारामची जन्मठेपेची शिक्षा कायम ठेवली आहे. न्यायमूर्तींच्या खंडपीठाने आज हा महत्त्वपूर्ण निकाल सुनावताना आसारामला तातडीने न्यायालयात आत्मसमर्पण करण्याचे आदेश दिले आहेत. या प्रकरणात सुमारे महिनाभरापूर्वी दोन्ही बाजूंचा युक्तिवाद पूर्ण झाला होता, ज्यावर न्यायालयाने आपला निर्णय राखून ठेवला होता. आज झालेल्या अंतिम सुनावणीत न्यायालयाने इतर दोन सह-आरोपींची मात्र निर्दोष मुक्तता केली आहे. पीडितेला न्याय देण्याच्या दृष्टीने आणि कायद्याचे राज्य अबाधित राखण्यासाठी हायकोर्टाचा हा निर्णय अत्यंत महत्त्वपूर्ण मानला जात आहे. आसारामच्या वकिलांनी प्रकृतीचे कारण देत



सवलतीची मागणी केली होती, परंतु न्यायालयाने ती फेटाळून लावत कडक शब्दांत आत्मसमर्पण करण्यास सांगितले आहे. या ऐतिहासिक निर्णयामुळे पीडित कुटुंबाला मोठा दिलासा मिळाला असून कायद्याची सर्वोच्चता पुन्हा एकदा सिद्ध झाली आहे.

# वडवणी तालुक्यात २७ मे च्या मध्यरात्री चक्रीवादळाचा हाहाकार

पत्रे उडाली, झाडे उन्मळून पडली! आंबा-केळी,चिंच,जांभूळ तसेच इतर बागांसह सोलार सिस्टीमचे लाखोंचे नुकसान,तात्काळ मदतीची मागणी

वडवणी ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील वडवणी तालुका आणि परिसरात दि. २७ मे च्या मध्यरात्री अचानक आलेल्या भीषण चक्रीवादळाने प्रचंड थैमान घातले. मध्यरात्रीच्या सुमारास सुटलेल्या या काळजाचा थरकाप उडवणाऱ्या वादळी वाऱ्याने आणि पावसाने संपूर्ण परिसराला झोडपून काढले असून, यामुळे शेतकऱ्यांचे आणि सामान्य नागरिकांचे हजारो रुपयांचे नुकसान झाले आहे.घरांची पडझड; पत्रे हवेत उडाले, झाडे उन्मळून पडल

२७ मे च्या मध्यरात्री नागरिक गाढ झोपेत असताना अचानक वातावरणात बदल झाला आणि ढगांच्या गडगडाटासह तीव्र वेगाने चक्रीवादळ धडकले. वाऱ्याचा वेग इतका प्रचंड होता की, अनेक घरांवरील छप्परे आणि लोखंडी पत्रे पत्त्यांसारखे हवेत उडून गेले. अंधारामध्येच अनेक ठिकाणी जुनी आणि मोठी झाडे उन्मळून रस्त्यावर व घरांवर पडल्याने मोठी घबराट पसरली. वादळामुळे विजेचे खांब कोलमडल्याने अनेक गावांचा वीजपुरवठा पूर्णपणे खंडित झाला आहे.

शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला

या मध्यरात्री आलेल्या चक्रीवादळाचा सर्वात मोठा फटका वडवणीतील बळीराजाला बसला आहे. परिसरातील फळबागांचे अतोनात नुकसान झाले आहे: आंबा व केळीच्या बागा उद्ध्वस्त: आलेल्या आंब्याच्या बागा भुईसपाट झाल्या असून, केळीच्या झाडांचे कंबरडे मोडले आहे. इतर फळबागांचेही न भरून निघणारे नुकसान झाले आहे. सोलार पॅनेल्सचे नुकसान: शासनाच्या व स्वतःच्या पैशातून शेतात बसवलेले महागडे सोलार पॅनेल्स वादळी वाऱ्यामुळे उडून गेले व त्यांचे तुकडे झाले. यामुळे शेतकऱ्यांचे दुहेरी नुकसान झाले आहे.

२७ मे च्या मध्यरात्री अचानक आलेल्या वादळाने आमचं सगळं काही हिरावून नेलं. बँकेकडून कर्ज काढून आम्ही आंबा आणि केळीची बाग जोपासली होती, ती एका रात्रीत मातीमोल झाली. आता जगायचं कसं, हाच मोठा प्रश्न आहे.

एक नुकसानग्रस्त शेतकरी, वडवणी.

प्रशासनाविरुद्ध शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप; तात्काळ मदतीची मागणी

रात्री झालेल्या या मोठ्या आपत्तीनंतर सकाळ उजाडताच नुकसानीचे भीषण वास्तव समोर आले. मात्र, अद्याप प्रशासकीय पातळीवर कोणतीही ठोस हालचाल झालेली नाही, असा आरोप परिसरातील शेतकऱ्यांनी केला आहे. पंचनामे करण्यासाठी अद्याप महसूल किंवा कृषी विभागाचे अधिकारी बांधावर पोहोचले नसल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.



# एकल महिलांसाठी स्वतंत्र सर्वंकष धोरण बनविण्यासाठी मसुदा समिती स्थापन

## एकल महिलांच्या जीवनात आशेची पालवी फुटली – बाजीराव ढाकणे

बीड/प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्यातील लाखो एकल महिलांच्या जीवनात सामाजिक, आर्थिक आणि मानसिक परिवर्तन घडवून आणणारा ऐतिहासिक निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला असून,एकल महिलांसाठी स्वतंत्र राज्य धोरण तयारकरण्यासाठी मसुदा समितीची स्थापना करण्यात आली आहे. महिला व बालकल्याण आयुक्त यांच्या अध्यक्षते खाली गठीत करण्यात आलेल्या या समितीत विविध शासकीय विभागांचे वरिष्ठ अधिकारी,महिलांच्या प्रश्नांवर काम करणाऱ्या संस्था आणि तज्ज्ञांचा समावेश करण्यात आला आहे.विशेष म्हणजे,राज्य भर एकल महिलांच्या प्रश्नांवर सातत्याने आवाज उठवणाऱ्या साऊ एकल महिला समितीचे राज्य निमंत्रक हेरंब कुलकर्णी यांनाही समितीत स्थान देण्यात आले आहे.या निर्णयाचे स्वागत करत साऊ एकल महिला समिती,महाराष्ट्र राज्याचे बीड जिल्हा समन्वयक बाजीराव ढाकणे यांनी हा निर्णय राज्यातील एकल महिलांच्या सन्मान, सुरक्षितता आणि सक्षमीकरणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण असल्याचे सांगितले. महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरणार आहे,जे एकल महिला साठी स्वतंत्र धोरण तयार करणार आहे.हा निर्णय केवळ प्रशासनीक नाही, तर सामाजिक न्याय आणि मानवी संवेदन शीलतेचा मोठा टप्पा आहे.या धोरणामुळे लाखो महिलांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडतील असे त्यांनी नमूद केले.

राज्यातील एकल महिलांची वाढती संख्या आणि त्यांच्या समोरील गंभीर प्रश्न पाहता स्वतंत्र धोरणाची गरज अनेक वर्षांपासून व्यक्त होत होती.२०११च्याजनगणने नुसार महाराष्ट्रात सुमारे ५४ लाख एकल महिला होत्या.गेल्या दीडदशकात सामाजिक आणिआर्थिक परिस्थितीत मोठे बदल झाले असून,आज ही संख्या किमान ७० लाखांच्या घरात पोहोचली असावी,असा अंदाज व्यक्त केला जात आहे.विधवा,परित्यक्ता, घटस्फोटित,अविवाहित, पतीपासून विभक्त राहणाऱ्या तसेच विविध कारणांनी एकट्याने संसाराचा भार सांभाळणाऱ्या महिलांची संख्या ग्रामीण आणि शहरी भागात झपाट्याने वाढत आहे.या महिलांना केवळ आर्थिकच नव्हे, तर सामाजिक बहिष्कार, मानसिक ताण,कौटुंबिक असुरक्षितता,निवाऱ्याचा प्रश्न,आरोग्य सुविधा, मुलांचे शिक्षण,रोजगार, वारसाहक्क,शासकीय योजनांपर्यंत पोहोच आणि सुरक्षिततेसारख्या अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे.विशेषतः ग्रामीण भागात अनेक महिलांना सामाजिक दबाव, परंपरागत रूढी आणि आर्थिक असमानतेमुळे दुहेरी संघर्ष करावा लागतो.त्यामुळे या सर्व प्रश्नांचा सर्वंकष विचार करून स्वतंत्र आणि समन्वित धोरण तयार करण्याची मागणी सातत्याने होत होती.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याच्या अर्थसंकल्पीय भाषणात एकल महिला साठी स्वतंत्र धोरण जाहीर करण्याची घोषणा केली होती.याघोषणेनंतर साऊ एकल महिला समितीने सातत्याने पाठपुरावा केला. मुख्यमंत्री कार्यालयाचे प्रधान सचिव श्रीकर परदेशी यांनी या विषया वर दोन महत्त्वपूर्ण बैठका घेत महिला व बालकल्याण विभागाला मसुदा समिती स्थापन करण्याच्या सूचना दिल्या.त्यानंतर महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे आणि महिला व बालकल्याण राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी या विषयावर सविस्तर चर्चा करून समिती स्थापनेची प्रक्रिया पूर्ण केली.राज्य शासनाने या प्रश्नाकडे संवेदनशीलतेने पाहत विविध विभागांचा समन्वय साधण्याचा प्रयत्न सुरू केला आहे.

स्थापन करण्यातआलेली समिती राज्यातील सर्व शासकीय विभाग, लोक प्रतिनिधी,सामाजिक संस्था,महिला संघटना, अभ्यासक,कार्यकर्ते आणि प्रत्यक्ष एकल महिलांशी संवाद साधणार आहे.विविध विभागांच्या योजनांचे एकत्रीकरण,योजना मधील त्रुटी,आवश्यक बदल,नवीन उपक्रम आणि प्रभावी अंमल बजावणी याबाबत सविस्तर अभ्यास करून धोरणाचा मसुदा तयार करण्यात येणार आहे. महिला आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी व्हाव्यात, त्यांना सन्मानाने जगता यावे आणि शासकीय योजनांचा थेट लाभ मिळावा यासाठी विशेष तरतुदी करण्यातयेण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.एकल महिलांसाठी निवारा,रोजगार,कौशल्य विकास,स्वयंरोजगार, आरोग्य विमा,मानसिक समुपदेशन,मुलांच्या शिक्षणासाठी विशेष सुविधा,सामाजिकसुरक्षा,कायदेशीर मदत आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये प्रतिनिधित्व अशा अनेक मुद्द्यांचा या धोरणात समावेश होण्याची शक्यता आहे. ग्रामीण भागातील महिलांना स्वयंसहाय्यता गटांद्वारे आर्थिकबळकटी देणे,शहरांतील महिलां साठी रोजगार आणि निवासाच्या सुविधा निर्माण करणे,तसेच समाजातील भेदभाव कमी करण्यासाठी जनजागृती मोहिमा राबविणे यासारख्या बाबींनाही प्राधान्य दिले जाऊ शकते.बाजीराव ढाकणे यांनी सांगितले की,एकल महिला या दयेचा नव्हे तर अधिकारांचा विषय आहेत.शासनाने या महिलांच्या प्रश्नांकडे केवळ कल्याणकारी दृष्टीने नव्हे,तरसामाजिक न्यायाच्या दृष्टिकोनातून पाहणे आवश्यक आहे.हे धोरण प्रभावीपणे राबविले गेले तर लाखो महिलांना नव्याने उभे राहण्याची ताकद मिळेल

राज्यातील विविधमहिला संघटना व सामाजिक कार्यकर्त्यांनीही या निर्णयाचे स्वागत केले आहे.शासनाने प्रत्यक्ष एकल महिलांच्या भावना,अनुभव आणि अपेक्षा जाणून घेत धोरण तयार करावे,अशीमागणी होत आहे.या धोरणामुळे शासन यंत्रणा अधिक संवेदनशील होईल आणि समाजात एकल महिलां कडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलण्यास मदत होईल, असा विश्वास साऊ एकल महिला समितीचे बाजीराव ढाकणे यांनी व्यक्त केला आहे.

राज्यातील लाखो एकल महिलांसाठी हा निर्णय आशेचा किरण ठरत असून,आगामी काळात हे धोरण त्यांच्या जीवन मानात सकारात्मक बदल घडवून आणणारे ठरेल,अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे

एकल महिलांसाठी निवारा,रोजगार,कौशल्य विकास,स्वयंरोजगार, आरोग्य विमा,मानसिक समुपदेशन,मुलांच्या शिक्षणासाठी विशेष



सुविधा,सामाजिक सुरक्षा,कायदेशीर मदत आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये प्रतिनिधित्व अशा अनेक मुद्द्यांचा या धोरणात समावेश होण्याची शक्यता आहे. ग्रामीण भागातील महिलांना स्वयंसहाय्यता गटांद्वारे आर्थिक बळकटी देणे,शहरांतील महिलांसाठी रोजगार आणि निवासाच्या सुविधा निर्माण करणे, तसेच समाजातील भेदभाव कमी करण्या साठी जनजागृती मोहिमा राबविणे यासारख्या बाबींनाही प्राधान्य दिले जाऊ शकते.

बाजीराव ढाकणे,बीड जिल्हा समन्वयक,साऊ एकल महिला समिती, महाराष्ट्र राज्य मो. ९४२१९८९९०९

# सावधान! उन्हाळी सुट्ट्यांमध्ये बंद घरे चोरट्यांच्या रडारवर

## नागरिकांनी सजग राहण्याचे अंबाजोगाई शहर पोलिसांचे आवाहन

अंबाजोगाई ।प्रतिनिधी

उन्हाळी सुट्ट्या, जत्रा आणि इतर कारणांमुळे नागरिक मोठ्या प्रमाणावर बाहेरगावी जात असल्याच्या पार्श्वभूमीवर, अंबाजोगाई शहरात घरफोडी आणि चोऱ्यांच्या घटनांना आळा घालण्यासाठी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शरद जोगदंड यांनी नागरिकांना विशेष काळजी घेण्याचे जाहीर आवाहन केले आहे. सुट्ट्यांच्या काळात बंद घरांना लक्ष्य करून होणाऱ्या गुन्ह्यांचा धोका लक्षात घेता, पोलिसांनी नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आणि मालमत्तेच्या रक्षणासाठी नियमावली जाहीर केली असून त्याचे काटेकोर पालन करण्याचे सूचित केले आहे.

नागरिकांनी बाहेरगावी जाताना घराला व्यवस्थित कुलूप लावावे आणि शक्य असल्यास डबल लॉकचा वापर करावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे. घर बंद राहणार असल्यास त्याची कल्पना विश्वासू शेजारी किंवा नातेवाईकांना देऊन त्यांच्यावर देखरेख ठेवण्याची जबाबदारी सोपवावी. तसेच, सोशल मीडियावर प्रवासाचे बेत किंवा 'घर बंद आहे' अशी माहिती पोस्ट करणे टाळावे, कारण यामुळे गुन्हेगारांना आयते निमंत्रण मिळू शकते. घरात मोठ्या प्रमाणात रोकड किंवा दागिने न ठेवता ते बँकेच्या लॉकरमध्ये सुरक्षित ठेवावेत आणि घर परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे व रात्रीच्या वेळी पुरेशा प्रकाशाची व्यवस्था करावी, असे पोलीस प्रशासनाने म्हटले आहे.

गुन्हेगारी कारवायांना प्रतिबंध करण्यासाठी नागरिकांनी अनोळखी व्यक्तींवर लक्ष ठेवावे. घरात कामगार, वॉचमन किंवा भाडेकरू ठेवताना त्यांची पोलीस पडताळणी करून घेणे अत्यंत आवश्यक आहे. प्रवासादरम्यान अनोळखी व्यक्तींकडून खाद्यपदार्थ स्वीकारू नयेत आणि बस, रेल्वेमध्ये आपल्या मौल्यवान वस्तूंची काळजी घ्यावी. कोणतीही संशयास्पद व्यक्ती किंवा हालचाल आढळून आल्यास त्वरित स्थानिक पोलीस स्टेशन किंवा ११२ या आपत्कालीन क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन पोलीस निरीक्षक शरद जोगदंड यांनी केले असून 'सजग नागरिक, सुरक्षित समाज' ही संकल्पना राबवून सुरक्षिततेची जबाबदारी सामूहिकपणे पार पाडण्याचे आवाहन केले आहे.

# जाफराबाद हादरले बुलेट चोरांनी ७ वार करून मिरची व्यापाऱ्याला संपवले पुतण्या मृत्यूशी झुंजतोय

## जाफराबाद पोलीस मात्र गाढ झोपेत जंजाळवाडी रक्ताने माखली मध्यरात्री १ वाजता घरासमोरच थरार

**जाफराबाद विशेष प्रतिनिधी इसराररखान पठाण**

**जाफराबाद शहर आणि परिसर पुन्हा एकदा गुन्हेगारीच्या भीषण विळख्यात सापडला असून कायद्याचा धाक पूर्णपणे संपल्याचे चित्र निर्माण झाले आहे. सिद्धार्थ नगर चिखली रोड येथील जंजाळवाडी परिसरात २७ मे २०२६ रोजी मध्यरात्री १ ते २ वाजेच्या सुमारास एका प्रसिद्ध मिरची व्यापाऱ्याची चोरट्यांनी धारदार शस्त्राने सपासप वार करून निर्घृण हत्या केली. शेख मोहसीन शेख मजीद वय ४६ असे मृत व्यापाऱ्याचे नाव आहे. या जीवघेण्या हल्ल्यात त्यांचा पुतण्या शेख साहिल शेख मोबिन वय २२ हा गंभीर जखमी झाला असून तो जालना जिल्हा रुग्णालयात मृत्यूशी झुंज देत आहे.**

या थरारक आणि रक्ताळलेल्या घटनेमुळे संपूर्ण जाफराबाद तालुक्यात तीव्र संतापाची लाट उसळली असून चोरटे सुसाट आणि जाफराबाद पोलीस गार झोपीत अशी घणाघाती टीका आता नागरिक उघडपणे करत आहेत.रक्ताचा थरार प्रतिकार केला म्हणून ७ वार

मिळालेल्या माहितीनुसार मध्यरात्री शेख मोहसीन यांच्या घरासमोर उभी असलेली बुलेट दुचाकी चोरटे चोरून नेण्याचा प्रयत्न करत होते. चोरांची चाहूल लागताच मोहसीन आणि त्यांचा पुतण्या साहिल यांनी धाडस दाखवून चोरांचा पाठलाग केला. मात्र जंजाळवाडी परिसरात दबा धरून बसलेल्या निर्दयी चोरट्यांनी उलटून हल्ला केला.

चोरट्यांनी धारदार शस्त्राने मोहसीन यांच्यावर डोके, मान, पाठ आणि डाव्या दंडावर तब्बल ७ ठिकाणी सपासप वार केले. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या मोहसीन यांना वाचवण्यासाठी पुतण्या साहिल पुढे आला असता चोरांनी त्यालाही गंभीर जखमी केले आणि अंधाराचा फायदा घेऊन पसार झाले. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या मोहसीन यांना उपचारासाठी जालना येथे घेऊन जात असताना रस्त्यातच त्यांची प्राणज्योत मालवली.

अत्यंत मनमिळाऊ चेहरा हरपला

मृत शेख मोहसीन हे जाफराबादमधील



प्रसिद्ध मिरची व्यापारी होते. न्यू हायस्कूलमध्ये कार्यरत असलेले शिक्षक शेख मोबिन सर यांचे ते लहान बंधू होते. अत्यंत मनमिळाऊ धार्मिक आणि मदतीला धावून जाणारा व्यक्ती म्हणून त्यांची ओळख होती. त्यांच्या या निर्घृण हत्येमुळे कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे.

जाफराबादकरांचा उद्रेक व्यापारी महासंघा कडून कडकडीत बंद

या हत्येची बातमी वाऱ्यासारखी पसरताच संपूर्ण जाफराबाद शहरात तणावाचे वातावरण निर्माण झाले. संतप्त नागरिकांनी जंजाळवाडी परिसरात मोठी गर्दी केली. आरोपींना तात्काळ अटक करा आणि त्यांना फाशी द्या अशा घोषणा देत नागरिकांनी पोलीस प्रशासनाचा जाहीर निषेध केला. वाढत्या गुन्हेगारीच्या निषेधार्थ व्यापारी महासंघाने जाफराबाद कडकडीत बंद ठेवण्याची हाक दिली आहे. नागरिकांचा रोष पाहता शहरात कमालीचा तणाव आहे.

१२ तास उलटले तरी आरोपी मोकाट पोलिसांचा ॲक्शन मोड की निव्वळ देखावा ?

घटनेची माहिती मिळताच भोकरदन उपविभागीय पोलीस अधिकारी आणि जाफराबाद पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ताफ्यासह घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून गुन्हे नोंदवण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. शहराच्या नाकेबंदीसाठी पथके रवाना करण्यात आल्याचा दावा पोलिसांनी केला असला, तरी घटना घडून १२ तास उलटूनही आरोपी अद्याप मोकाटच आहेत. त्यामुळे पोलिसांच्या कार्यक्षमतेवर आणि रात्रीच्या गस्तीवर आता गंभीर प्रश्नचिन्ह उभे ठाकले आहे.

या प्रश्नांची उत्तरं पोलीस प्रशासनाला द्यावीच लागतील!

जाफराबाद पोलिसांच्या नाकर्तेपणामुळे आज एका निष्पाप व्यापाऱ्याचा बळी गेला आहे. जनतेच्या मनात उभे राहिलेले हे जळजळीत प्रश्न प्रशासनाने गांभीर्याने घेण्याची गरज आहे

रात्रीची गस्त कुठे गायब होती ? जर पोलीस गस्तीवर होते तर चोरटे शहरात इतके बिनधास्त शस्त्र घेऊन फिरतातच कसे ? बुलेट चोरणारी ही सराईत टोळी कोणाची ? आधी झालेल्या चोऱ्यांचा तपास लावण्यात अपयश आल्यामुळेच चोरांचे मनोधैर्य एवढे वाढले का ? चोरटे की पाशवी मारेकरी ? चोरी पकडली गेल्यावर थेट ७ वार करून हत्या करण्याची हिंमत या गुन्हेगारांमध्ये आली कुठून ? यांना कोणाचा वरदहस्त आहे ? शहरातील सीसीटीव्ही फक्त शोभेचे का ? जर सीसीटीव्ही कॅमेरे आहेत तर त्यांचे फुटेज मिळवून आरोपींना पकडण्यास उशीर का होत आहे ? विशेष पथक कधी नेमणार ? जाफराबादमधील गुन्हेगारी मोडीत काढण्यासाठी पोलीस अधीक्षक कधी विशेष पथक नेमणार की अजून काही बळी जाण्याची वाट पाहणार ?

आम्हाला फक्त न्याय पाहिजे कुटुंबाचा आर्त टाहो

शेख मोहसीन यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली आणि एक मुलगा असा मोठा परिवार उघड्यावर पडला आहे. त्यांचे मोठे बंधू शेख मोबिन सर यांनी अश्रूंना वाट मोकळी करून देत प्रशासनाला जाब विचारला: माझा निष्पाप भाऊ गेला आता हॉस्पिटलमध्ये पुतण्या साहिलची काय अवस्था होईल माहीत नाही. आम्हाला राजकारण नको फक्त आणि फक्त न्याय पाहिजे माझ्या भावाच्या मारेकऱ्यांना फासावर लटकवा

जाफराबाद आता शांत बसणार नाही. जोपर्यंत या नराधम चोरांना बेड्या ठोकल्या जात नाहीत आणि जाफराबादमधील जनतेला सुरक्षिततेची हमी मिळत नाही तोपर्यंत नागरिकांचा हा आक्रोश शांत होणार नाही हे मात्र नक्की

# मुख्यमंत्री समृध्दी पंचायत राज अभियान २०२५-२६ अंतर्गत केज तालुक्यातील कुंबेफळ ग्रामपंचायतची जिल्हा स्तरीय तपासणी

केज/प्रतिनिधी

मुख्यमंत्री समृध्दी पंचायतराज अभियान अंतर्गत तालुकास्तरीय तपासणी समिती पंचायत समिती मंगळवेढा जि.सोलापुर च्या समितीने दि.११ मे २०२६ रोजी श्री. विजयकुमार देशमुख गटविकास अधिकारी पंचायत समिती मंगळवेढा,अशोक नलावडे विस्तार अधिकारी,ज्ञानेश्वर जतकर आरजीएस यांनी केज तालुक्यातील कुंबेफळ ग्रामपंचायतची तपासणी केली होती. त्यामध्ये कुंबेफळ ग्रामपंचायतला १ क्रमांक मिळाला.दि.२६ मे २०२६ रोजी जळगावचे मा.मुख्य कार्यकारी अधिकारी करिष्मा नायर साहेब,उपमुख्यकार्यकारी अधिकारी भाऊसाहेब आकलडे साहेब यांनी जिल्हास्तरीय ग्राम पंचायत कुंबेफळ ता. केज ची तपासणी केली. यामध्ये आरोग्य विभाग, अंगणवाडी,कृषी,बचत गट,तलाठी कार्यालय, वाचनालय,शिक्षण विभाग अंतर्गत जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ शाळेची पाहणी करून



तपासणी केली.सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.सर्व अभिलेखे तपासले. कुंबेफळ ग्रामपंचायतने राबविलेले विविध उपक्रमांची पाहणी केली. केज पंचायत समितीचे गटविकास अधिकारी मा.श्री.नागरगोजे साहेब, शिक्षण विभागाचे बीड जिल्हा परिषदेचे मा.उप शिक्षणाधिकारी श्री.मयुर मोदानी साहेब,केजचे गटशिक्षणाधिकारी मा. श्री.सुनिल केंद्रे साहेब, केज केंद्राचे मा.केंद्र प्रमुख संजय चौरे साहेब , कुंबेफळ ग्रामपंचायतचे विद्यमान सरपंच श्री.अविनाश पांचाळ, उपसरपंच सौ.श्रध्दा विष्णु थोरात,विष्णु आबा थोरात,ग्रामविकास अधिकारी श्रीमती रेवती भोसले मॅडम,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा सौ.शालु विजय थोरात,डाटा ऑपरेटर संदीप उध्दव थोरात, मनोज थोरात,कुंबेफळ ग्रामपंचायतचे सर्व कर्मचारी,ग्रामपंचायत सदस्य,जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ केंद्र केज मुलांची ता.केज शाळेचे अपग्रेड मुख्याध्यापक श्री.राजाभाऊ दत्तात्रय कदम,प्राथमिक पदवीधर शिक्षक डॉ.रामकिशन ग्यानबा मुळे सर,गणित विज्ञानचे प्राथमिक पदवीधर शिक्षक श्री. संदीप मेघराज ठोंबरे सर, आदर्श शिक्षक श्री. आकाश दत्तु लोंढे सर, आदर्श शिक्षक श्री. आबासाहेब तुळशिराम धपाटे सर,राहुल बजरंग बचुटे सर,श्रीमती निलावती अनिलकुमार भोरे मॅडम,श्रीमती अंजली गोविंदराव उटीकर मॅडम,अंगणवाडी ताई,मदतनीस,पीएम पोषण शक्ती निर्माण योजना कामगार सौ. सुवर्णमाला पवार,सौ. अनिता पवार,विद्यार्थी उपस्थित होते.जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ केंद्र केज मुलांची ता.केज या शाळेची या समितीने सर्व सुविधांची पाहणी करून कसून तपासणी करून सखोल मार्गदर्शन केले व समाधान व्यक्त केले.

# जालना एमआयडीसी परिसरात दहशत माजवणाऱ्यांना चंदनझिरा पोलिसांचा दणका

जालना ।प्रतिनिधी

जालना शहरातील एमआयडीसी परिसरात अवैध धारदार शस्त्रे बाळगून दहशत निर्माण करणाऱ्या दोन तरुणांच्या मुसक्या आवळत चंदनझिरा पोलिसांनी दमदार कारवाई केली आहे. पोलिसांच्या या धडक क्शनमुळे गुन्हेगारांमध्ये एकच खळबळ उडाली असून शहरातील कायदा व सुव्यवस्था बिघडविणाऱ्यांना कडक इशारा मिळाला आहे.

दि. २७ मे २०२६ रोजी रात्री ११ वाजण्याच्या सुमारास एमआय डीसी भागातील खराब पार्किंग समोरील एमआयडीसी रोडवर दोन युवक अवैधरित्या धारदार खंजर बाळगून फिरत असल्याची गोपनीय माहिती पोलिस निरीक्षक श्री. बाळासाहेब पवार यांना मिळाली होती. माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ सापळा रचत संशयितांना ताब्यात घेत झडती घेतली असता त्यांच्या जवळून दोन धारदार खंजर



**अवैध धारदार शस्त्रांसह दोन तरुण जेरबंद २ खंजर जप्त शहरात खळबळ**

जप्त करण्यात आले.या कारवाईत आरोपी ओंकार शामराव सिंघल वय २२ रा. संतोषीमाता नगर मुकुंदवाडी छत्रपती संभाजीनगर व ओंकार गिरीजाशंकर शेळके वय १९ रा. धनगर पिंप्री ता.अंबड जि. जालना यांना अटक करण्यात आली. दोघांविरोधात भारतीय हत्यार कायद्यान्वये स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पोलिस निरीक्षक बाळासाहेब पवार यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई पार पडली. या मोहिमेत पोलीस उपनिरीक्षक मनस्वे वताळ, पोहेकॉ प्रवीण देशमुख, कृष्णा तंगे, रवींद्र देशमुख आदींनी सक्रिय सहभाग घेतला.जालना शहरात अवैध शस्त्रे गुन्हेगारी आणि दहशत माजविणाऱ्यांविरोधात पोलिसांनी आता आक्रमक पवित्रा घेतला असून अशा प्रवृत्तींना कुठलीही दया दाखवली जाणार नसल्याचा स्पष्ट संदेश या कारवाईतून देण्यात आला आहे.



# धोंड्याच्या महिन्यातील एकादशी पर्वावर

## पैठण येथील नाथ समाधीचे हजारो भाविकांनी घेतले दर्शन

पैठण ।प्रतिनिधी

दक्षिण काशीतील पैठण या अध्यात्मिक तथा धार्मिक भुमीत दर तीन वर्षांनी येणाऱ्या धोंड्याचा तथा अधिक मास म्हणून ओळखल्या जाणारा कालावधी महिना सध्या सुरू असुन या पवित्र महिन्यात भाविक वर्ग धार्मिक उत्सव साजरा करतात.जप,तप,ध्यान करुन भगवंताचे चिंतन करणे,प्रवचने कीर्तने आयोजित करून भगवंताचे नामस्मरण करणे,सामुहिक ग्रंथांचे वाचन करणे, चुक भुलीने एखादे कृत्य घडणे त्यातून मुक्तता मिळण्यासाठी गोदावरीत स्नान करणे पूरोहितांकडुन कुटुंबात सुख समाधान लाभावे म्हणून विधी करून घेणे अदि उपक्रम भाविक राबवतात हे उत्सव पैठण नगरीत धोंड्याच्या महिन्यात साजरे होत आहेत. अधिक मास महिन्यातील एकादशीला फार महत्त्व असते. त्यामुळे दि.२७ बुधवारी भल्या पहाटे पासुन मराठवाड्याच्या कान्याकोपऱ्यातुन भाविकांनी गोदावरी स्नान करून नाथ समाधीचज दर्शन घेऊन शहरातील मंदिरातील देवदेवतांचे दर्शन घेतले. प्रखर ऊन असतांनाही भाविक पैठण येथे दर्शनासाठी आले. व लगेच परतले.शहरातील मठ मंदिरातून धोंड्याची एकादशी भक्तीमय वातावरणात साजरी करण्यात आली.संतनगर परिसरात एकादशी निमित्ताने छोट्याशा यात्रेचे स्वरूप आले होते.

# महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन कायदा हिंदूंच्या धार्मिक अधिकारांवर गदा आणणारा तात्काळ मागे घ्या

महाराष्ट्र मंदिर महासंघ आणि भाविकांचा राज्य सरकारला इशारा अन्यथा तीव्र आंदोलनाचा भडका उडणार

विशेष प्रतिनिधी शेख फारुक :- मुंबई राज्य शासनाच्या महसूल व वन विभागाद्वारे प्रस्तावित असलेल्या महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन प्रारूप अधिनियम २०२६ या कायद्याविरोधात आता राज्यभरातून तीव्र संतापाची लाट उसळली आहे. हा कायदा म्हणजे हिंदू देवस्थानांच्या धार्मिक आणि मालमत्ताविषयक अधिकारांचे थेट उल्लंघन करणारा असूनसरकारने हा मसुदा तात्काळ मागे घ्यावा अशी जोरदार मागणी महाराष्ट्र मंदिर महासंघ आणि समस्त हिंदू समाज पुजाऱ्यांकडून करण्यात आली आहे. या संदर्भात महासंघाचे राष्ट्रीय संघटक श्री. सुनील घनवट यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने थेट तहसीलदार साहेबांना कायदेशीर आक्षेप घेणारे आणि चेतावणी देणारे निवेदन सादर केले आहे.

केवळ हिंदू देवस्थानांनाच टार्गेट का ? सेक्युलर सरकारचा दुटप्पीपणा

महाराष्ट्र मंदिर महासंघाने या कायद्यातील पक्षपातीपणावर अत्यंत कडक शब्दांत बोट ठेवले आहे. या कायद्याच्या कलम १ उपकलम २ अन्वये वक्फ अधिनियम १९९५ च्या अखत्यारीत येणाऱ्या जमिनींना या कायद्यातून जाणीवपूर्वक वगळण्यात आले आहे. जर शासन स्वत:ला सेक्युलर म्हणवून घेते तर मग केवळ हिंदू मंदिरांच्याच जमिनींचे निर्मूलन का केले जात आहे ? वक्फ मालमत्तांना विशेष कायदेशीर संरक्षण आणि हिंदूंच्या देवस्थान जमिनी हडपण्याचा हा डाव म्हणजे भारतीय राज्यघटनेच्या कलम १४ समानतेचा अधिकार चे सरळ सरळ उल्लंघन आहे असा घणाघाती आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

मंदिरांची संपत्ती हडपण्याचा आणि व्यापाराचा छुपा अजेंडा

या कायद्यातील जाचक कलमांमुळे मंदिरांचे अस्तित्वच धोक्यात येणार असल्याचे महासंघाने पुराव्यांसह स्पष्ट केले आहे

कलम ३ आणि ४ देवस्थान इनामे नष्ट करून मंदिरांच्या जमिनी बेकायदेशीरपणे वहिवाटदार आणि कथित कब्जाधारकांच्या नावे केल्या जात आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार देवस्थानची सेवा खंडित करणाऱ्यांना जमिनीवर राहण्याचा अधिकार नाही तरीही चुकीच्या व्यक्तींना मालकी हक्क देऊन मंदिरांच्या उत्पन्नाचा मुख्य स्त्रोतच नष्ट केला जात आहे.

कलम ६ कुळांना जमिनीचे हक्क देऊन भविष्यात या पवित्र जमिनींचे व्यापारीकरण करण्याचा मार्ग मोकळा



केला जात आहे. कलम ९ आणि १५ देवस्थानांच्या ताब्यातील रस्ते तलाव विहिरी आणि पाण्याच्या टाक्या कोणत्याही मोबदल्याशिवाय राज्य शासन स्वतःच्या ताब्यात घेणार आहे. हा देवाच्या मालमत्तेवर थेट दरोडा आहे कलम १५ नुकसानभरपाई कोट्यवधी रुपयांच्या जमिनी काढून घेऊन त्याबदल्यात नाममात्र किरकोळ वार्षिक महसूल किंवा रोख अनुदान देण्याची तरतूद आहे जी भविष्यात कधीही बंद होऊ शकते. यामुळे मंदिरे पूर्णपणे परावलंबी होतील.

न्यायालयीन अधिकार नाकारून हुकूमशाहीचा प्रयत्न

या कायद्यातील सर्वात धक्कादायक तरतूद म्हणजे कलम १८. या कलमाद्वारे महसूल अधिकाऱ्यांच्या कोणत्याही निर्णयाविरोधात दिवाणी न्यायालयात दाद मागण्यास स्पष्ट बंदी घालण्यात आली आहे हा भाविक आणि विश्वस्तांच्या मूलभूत अधिकारांवर घाला असून राज्यघटनेने दिलेल्या न्यायिक पुनर्विलोकन च्या अधिकाराची ही क्रूर थट्टा आहे.

तर समस्त हिंदू समाज उग्र आंदोलन छेडणार

महाराष्ट्र मंदिर महासंघाने सरकारला निर्वाणीचा इशारा दिला आहे की या कायद्याबाबत सूचना व हरकती दाखल करण्यासाठी दोन महिन्यांची मुदतवाढ देण्यात यावी. तसेच गुजरात राज्याच्या धर्तीवर महाराष्ट्रातही अँटी लँड ग्रॅबिंग क्ट संमत करून देवस्थानच्या जमिनींचे रक्षण करावे.

देवस्थानची मूर्तीही कायदेशीररीत्या ज्युरिस्टिक पर्सन कायदेशीर व्यक्ती आहे. देवाच्या मालकीची संपत्ती हिरावून घेण्याचा अधिकार सरकारला नाही. शासनाने या निवेदनाची गांभीर्याने दखल घेऊन हा काळा कायदा मागे घ्यावा अन्यथा संपूर्ण महाराष्ट्रात हिंदू समाज रस्त्यावर उतरून उग्र आंदोलन छेडेल श्री. सुनील घनवट राष्ट्रीय संघटक महाराष्ट्र मंदिर महासंघ.

या प्रसंगी देवस्थानचे प्रतिनिधी पुजारी आणि मोठ्या संख्येने शिवभक्त व हिंदू बांधव उपस्थित होते. त्यांच्या स्वाक्षऱ्यांसह हे निवेदन प्रशासनाला सादर करण्यात आले असून आता चेंडू सरकारच्या दरबारात आहे. सरकार हिंदूंचा संताप शांत करते की आंदोलनाचा भडका उडवणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग अँण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# तळेगाव वाडी पिकाच्या नुकसानीचा जाब विचारणाऱ्या शेतकऱ्यावर ८ जणांचा जीवघेणा हल्ला दोन्ही हात आणि पाय केले फॅक्चर

## तळेगांव वाडी येथील थरार लोखंडी रॉड आणि चाकूने सपासप वार शेतकरी मृत्यूशी झुंजतोय सर्व आरोपी फरार

भोकरदन इसरारखान पठाण

तालुक्यातील तळेगाव वाडी येथे शेतीच्या वादातून माणुसकीला काळिमा फासणारी अत्यंत संतापजनक आणि क्रूर घटना समोर आली आहे. शेतातील उभ्या पिकाची नासधूस केल्याचा जाब विचारल्याचा राग मनात धरून दबा धरून बसलेल्या ८ जणांच्या टोळक्याने शेतकरी रामचंद्र मदन काकडवाल वय ४७ यांच्यावर लोखंडी रॉड चाकू आणि लाठ्या-काठ्यांनी अत्यंत निर्घृण व प्राणघातक हल्ला केला. २६ मे २०२६ रोजी पहाटे ६ वाजेच्या सुमारास हा रक्ताळलेला थरार घडला. या भ्याड हल्ल्यात गंभीर जखमी झालेले रामचंद्र काकडवाल हे सध्या जालना येथील रुग्णालयात मृत्यूशी झुंज देत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार २५ मे रोजी आरोपींनी रामचंद्र काकडवाल यांच्या शेतातील उभ्या पिकाची मोठ्या प्रमाणावर नासधूस केली होती. वर्षभराची मेहनत मातीत मिळालेली पाहून रामचंद्र यांनी आरोपींना याचा जाब विचारला. मात्र उलटा चोर कोतवाल को डांटे या म्हणीप्रमाणे आरोपींनी उलट रामचंद्र यांनाच जीवे मारण्याची धमकी देऊन शेतातून हाकलून लावले होते.

पहाटे घातला थरार काल लय माजला होता म्हणत रॉड अन् चाकूने सपासप वार

या वादाचा वचपा काढण्यासाठी आरोपींनी दुसऱ्याच दिवशी म्हणजे २६ मे रोजी पहाटेपासूनच शेतात दबा धरला होता. सकाळी ६ वाजता रामचंद्र नेहमीप्रमाणे शेतात पोहोचताच दबा धरून बसलेल्या टोळक्याने त्यांच्यावर हिंस्र प्राण्यासारखा हल्ला चढवला.

काल लय माजला होता का असे ओरडत आरोपी राहुल छगन काकडवाल याने थेट



रामचंद्र यांच्या डोक्यात लोखंडी रॉडचा जोरदार घाव घातला. तर प्रवीण छगन काकडवाल याने हातातल्या धारदार चाकूने त्यांच्या हातावर पायावर आणि पाठीवर सपासप वार केले. एवढ्यावरच न थांबता विठ्ठल, हिम्मत किसन सिंगल आणि इतर दोन अनोळखी इसमांनी रामचंद्र यांना जमिनीवर पाडून काठ्या आणि लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली.

दोन्ही हात पाय फॅक्चर प्रकृती अत्यंत चिंताजनक

हा हल्ला इतका भयानक होता की रामचंद्र काकडवाल यांचे दोन्ही हात आणि डावा पाय जागीच फॅक्चर मोडले झाले. त्यांच्या अंगावर, पाठीवर आणि पायावर चाकूचे खोल घाव असल्याने रक्तस्राव प्रचंड झाला. त्यांना तात्काळ भोकरदन ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले होते मात्र प्रकृती अत्यंत चिंताजनक असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी जालना जिल्हा सामान्य रुग्णालयातील अतिदक्षता विभागात आयसीयु हलवण्यात आले आहे.

८ जणांवर गुन्हा दाखल पोलीस यंत्रणा क्शन मोडमध्ये

या क्रूर हल्ल्याप्रकरणी भोकरदन पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नंबर ०२९४/२०२६ नुसार खालील आरोपींवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत: राहुल छगन काकडवाल, प्रवीण छगन काकडवाल, विठ्ठल रामलाल सिंगल, हिम्मत रामलाल सिंगल, किसन रामलाल सिंगल, यांच्यासह इतर दोन अनोळखी इसम आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ११८(२), १८९(२), १९१(२), १९० व इतर कलमान्वये गंभीर गुन्हे नोंदवण्यात आले आहेत.

घटनास्थळाचा पंचनामा धारदार शस्त्रे जप्त

२७ मे रोजी पोलिसांनी घटनास्थळी जाऊन कसून पंचनामा केला. यादरम्यान हल्ल्यात वापरलेले चाकू लाठ्या आणि काठ्या यांसारखी घातक सामग्री जप्त करण्यात आली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास हेड कॉन्स्टेबल एचसी सोमनाथ सहदेव मांडलिक अत्यंत वेगाने करत आहेत. घटनेनंतर सर्व आरोपी फरार झाले असून त्यांच्या मुसक्या आवळण्यासाठी पोलिसांची विशेष पथके रवाना करण्यात आली आहेत. एका निष्पाप शेतकऱ्यावर झालेल्या या जीवघेण्या हल्ल्यामुळे तळेगाव वाडी परिसरामध्ये तीव्र संताप व्यक्त होत असून आरोपींना तात्काळ अटक करण्याची मागणी होत आहे.

# लोकनेते,मराठवाडा भूषण आ.सुरेश धस यांच्या पाठपुराव्याला मोठे यश

आ.धस आणि नाम फाउंडेशनच्या माध्यमातून कानडीच्या पुरग्रस्त बंधाऱ्याला नवसंजीवनी

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) तालुक्यातील कानडी परिसरात मागील वर्षी झालेल्या मुसळधार पावसामुळे व आलेल्या भीषण पुरामुळे येथील बंधाऱ्याचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. पुराच्या प्रचंड प्रवाहामुळे बंधाऱ्याचे मूळ पात्र बदलले गेले होते. तसेच पाण्याच्या वेगामुळे बंधाऱ्याच्या साईडने मोठ्या प्रमाणात सुपीक शेती जमीन वाहून गेली होती. या घटनेमुळे परिसरातील शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले होते. अनेक शेतकऱ्यांच्या शेतीचे अस्तित्व धोक्यात आले होते, तर भविष्यात पुन्हा पूर आल्यास आणखी मोठे नुकसान होण्याची भीती ग्रामस्थांकडून व्यक्त केली जात होती.

या गंभीर समस्येची दखल घेत आष्टी मतदारसंघाचे लोकनेते, मराठवाडा भूषण आ. सुरेश धस यांनी तातडीने प्रशासनाकडे पाठपुरावा सुरू केला. ग्रामस्थांच्या अडचणी समजून घेत त्यांनी या कामासाठी सातत्याने प्रयत्न करत नाम फाउंडेशनच्या माध्यमातून बंधारा दुरुस्ती तसेच वाहून गेलेली जमीन पुन्हा बुजवण्याच्या कामाला मंजुरी मिळवून दिली. त्यांच्या प्रयत्नांमुळे अखेर या कामाला प्रत्यक्ष सुरुवात झाल्याने कानडी व परिसरातील ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या महत्त्वपूर्ण कामाचा शुभारंभ बुधवार दि.२७ रोजी उत्साहपूर्ण




वातावरणात मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. बंधारा दुरुस्ती व वाहून गेलेली जमीन बुजवण्याच्या कामाचे उद्घाटन आष्टी तालुका कडा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रमजान शेठ तांबोळी, मार्केट कमिटी संचालक संजय ढोबळे, सरपंच शेळके, फत्तेवडगावचे सरपंच नाना काळे तसेच गणप्रमुख अन्सार शेख यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी बेलगावचे माजी सरपंच दीपक भांबे, हरिभाऊ बाबर, आष्टी तालुका अध्यक्ष राजू शिंदे, माजी उपसरपंच दत्ताभाऊ खिळे, भारत खिळे, ग्रामपंचायत सदस्य सुनील शिंदे, आजीनाथ मेजर, लाला खिळे, शांतीलाल खिळे, अंकुश खिळे, सचिन खिळे, भाऊसाहेब खिळे, कैलास काळभोर, रघुनाथ खिळे यांच्यासह कानडी, बेलगाव व परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रामस्थांनी यावेळी आनंद व्यक्त करत या कामामुळे भविष्यात मोठा दिलासा मिळणार असल्याची भावना व्यक्त केली.

सदर काम पूर्ण झाल्यानंतर भविष्यातील पुराचा धोका कमी होण्यास मोठी मदत होणार असून बंधाऱ्यालगतच्या शेतीचे संरक्षण होणार आहे. तसेच वाहून गेलेली जमीन पुन्हा उपयोगात येण्यास मदत होणार असल्याने शेतकऱ्यांना मोठा आधार मिळणार आहे. अनेक दिवसांपासून रखडलेला प्रश्न अखेर मार्गी लागल्याने ग्रामस्थांनी लोकनेते आ. सुरेश धस तसेच नाम फाउंडेशनचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले. गावाच्या विकासासाठी आणि शेतकऱ्यांच्या हितासाठी लोकप्रतिनिधींनी केलेला सातत्यपूर्ण पाठपुरावा किती महत्त्वाचा असतो, याचे हे उत्तम उदाहरण आहे, अशा भावना यावेळी उपस्थित ग्रामस्थांनी व्यक्त केल्या.

# एमआरपी च्या नावाखाली ग्राहकांची लूट व्यवस्था रद्द करण्यासाठी अखिल भारतीय ग्राहक पंचायत आक्रमक

## केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्याकडे थेट मागणी आता जिल्हाधिकाऱ्यांमार्फत देशव्यापी आंदोलनाचा इशारा

जालना ।प्रतिनिधी

बाजारात विक्री होणाऱ्या पॅकिंग वस्तू औषधे आणि जीवनावश्यक साहित्यांवर छापल्या जाणाऱ्या अव्वाच्या सव्वा एमआरपी मुळे सर्वसामान्य ग्राहकांची उघड आर्थिक लूट सुरू असल्याचा गंभीर आरोप करत अखिल भारतीय ग्राहक पंचायत आता आक्रमक झाली आहे. सदोष एमआरपी व्यवस्था तात्काळ रद्द करून ग्राहकहिताचे नवीन दरनिर्धारण धोरण लागू करावे या मागणीसाठी संघटनेच्या राष्ट्रीय शिष्टमंडळाने केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले.

या राष्ट्रीय स्तरावरील हालचालीनंतर आता जिल्हा स्तरावरही आंदोलनाची धार तीव्र करण्यात येणार असून, देशभरातील जिल्हाधिकाऱ्यांमार्फत केंद्र सरकारला निवेदने देण्याचा इशारा ग्राहक पंचायतने दिला आहे.ग्राहकांची आर्थिक लूट थांबवा, एमआरपी कायद्यात तात्काळ सुधारणा करा अशी ठाम भूमिका संघटनेने घेतली आहे.केंद्रीय शिष्टमंडळाने मांडली ग्राहकांची व्यथा



ग्राहक पंचायतचे राष्ट्रीय अध्यक्ष नारायणभाई शाह राष्ट्रीय सचिव जयंत कथेरिया आणि राष्ट्रीय कोषाध्यक्ष प्रदीप बंसल यांच्या शिष्टमंडळाने अर्थमंत्र्यांची प्रत्यक्ष भेट घेत ग्राहकांची होत असलेली आर्थिक पिळवणूक आकडेवारीसह मांडली. उत्पादक कंपन्या मूळ उत्पादन खर्च अत्यल्प असताना वस्तूंवर अनेक पटींनी जादा एमआरपी छापतात आणि नंतर सवलत देत असल्याचा दिखावा करून ग्राहकांची दिशाभूल करतात असा गंभीर मुद्दा यावेळी उपस्थित करण्यात आला.

अव्वाच्या सव्वा किमतींमुळे ग्राहकांचे कंबरडे मोडले

ग्रामीण आणि शहरी भागात औषधे खाद्यपदार्थ सौंदर्यप्रसाधने तसेच इतर पॅकिंग वस्तूंवर अवास्तव एमआरपी छापण्याचे प्रकार मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. उत्पादन खर्च आणि बाजारभाव यामध्ये प्रचंड तफावत असतानाही ग्राहकांकडून जादा पैसे उकळले जात असल्याने सामान्य नागरिक आर्थिक संकटात सापडला आहे. एमआरपीच्या नावाखाली अधिकृत लूट सुरू आहे अशी संतप्त भावना ग्राहकांमधून व्यक्त होत आहे.

देशभरात आंदोलनाची तयारी

ग्राहकांच्या हक्कांसाठी आता जिल्हा स्तरावर मोठ्या प्रमाणावर निवेदने जनजागृती मोहीम आणि आंदोलन छेडण्यात येणार असल्याचे ग्राहक पंचायतने स्पष्ट केले. सर्वसामान्य ग्राहकांच्या खिशावर दिवसाढवळ्या दरोडा टाकणारी ही व्यवस्था मोडीत काढल्याशिवाय आम्ही शांत बसणार नाही असा आक्रमक इशाराही संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.

# मासिक अहवाल हा अत्यंत अचूक आणि एचएमआयएस प्रणालीनुसारच पाठवा-डॉ.शिवानी बोडखे-विधाते

## कडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात मिशन एड्स सुरक्षा कार्यशाळा संपन्न

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) मिशन एड्स सुरक्षा अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणी बाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले. रुग्णांना मिळणाऱ्या सेवांमध्ये कोणतीही कुचराई होऊ नये आणि शासनाच्या या महत्त्वाकांक्षी मोहिमेचे उद्दिष्ट कडा प्राथमिक आरोग्य केंद्राने १०० टक्के पूर्ण करावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. केंद्राचा सर्व मासिक अहवाल हा अत्यंत अचूक आणि एचएमआयएस प्रणालीनुसारच पाठवला जावा, अशा सक्त सूचना डॉ. बोडखे-विधाते यांनी संबंधितांना दिल्या.

समाजाला एड्सच्या विळख्यातून सुरक्षित ठेवण्यासाठी आणि या आजाराबाबत तळागाळापर्यंत जनजागृती करण्यासाठी आरोग्य विभागाच्या वतीने मिशन एड्स सुरक्षा हे महत्त्वपूर्ण अभियान राबवले जात आहे. याच अभियानांतर्गत दि.२६ मे रोजी कडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात आरोग्य अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी एका विशेष मार्गदर्शन कार्यशाळेचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत गरोदर माता आणि सामान्य रुग्णांच्या ट्रिपल एच




चाचण्या वाढवण्यावर आणि जिल्ह्याचे उद्दिष्ट साध्य करण्यावर विशेष भर देण्यात आला. जिल्हा शल्यचिकित्सक (बीड), जिल्हा एड्स नियंत्रण व प्रतिबंधक अधिकारी तसेच आष्टी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. रामदास मोराळे यांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यासाठी आष्टी येथील आयसीटीसी विभागाच्या समुपदेशक श्रीमती विशाखा मेश्राम आणि प्रयोगशाळा तंत्रज्ञ जयचंद नेलवाडे यांनी कडा प्राथमिक आरोग्य केंद्रास भेट देऊन उपस्थितांना मिशन एड्स सुरक्षा अभियानाबाबत सविस्तर प्रशिक्षण दिले. या कार्यशाळेत मार्गदर्शन करताना आयसीटीसीच्या पथकाने गरोदर माता आणि बाह्यरुग्ण विभागातील सामान्य रुग्णांसाठी ट्रिपल एच म्हणजेच एचआयव्ही, एचबीएसएजी कावीळ ब), एचसीव्ही - कावीळ क) आणि सिफलिस या आजारांच्या तपासण्या १०० टक्के कशा केल्या जातील, यावर मार्गदर्शन केले.

राष्ट्रीय स्तरावरील ९५-९५-९९ हे उद्दिष्ट काय आहे, सध्या आपल्या बीड जिल्ह्याची यासंदर्भातील स्थिती काय आहे आणि हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी गावपातळीवर काम करणाऱ्या आशा स्वयंसेविका व आरोग्य कर्मचाऱ्यांनी कोणती पावले उचलली पाहिजेत, यावर सखोल चर्चा करण्यात आली. प्राथमिक आरोग्य केंद्रातील आवश्यक चाचणी किट्सच्या उपलब्धतेचा आणि साठ्याचा आढावाही यावेळी घेण्यात आला. याव्यतिरिक्त एड्स प्रतिबंध आणि नियंत्रण कायदा २०१७ मधील तरतुदी आणि रुग्णांच्या मदतीसाठी असलेल्या १०९७ या टोल फ्री क्रमांकाबाबत सर्वांना अवगत करण्यात आले. या महत्त्वपूर्ण कार्यशाळेस वैद्यकीय अधिकारी डॉ. शिवानी बोडखे, डॉ. अमान बेग, आरोग्य सहाय्यक काळे, एल.एच.व्ही. आत्राम सिस्टर, ए.एन.एम., औषध निर्माता, आशा पर्यवेक्षिका श्रीमती धस यांच्यासह सर्व आशा स्वयंसेविका व आरोग्य कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुलांसह शिक्षकांनाही मोबाईल बंदीचा नियम लागू करा

## जिल्हा परिषद शाळा टिकवण्यासाठी ग्रामसभांनी ठोस निर्णय घ्यावा-ह.भ.प. निवृत्ती महाराज इंदुरीकर

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) सध्याच्या डिजिटल युगात मोबाईलचा वाढता वापर विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसह मानसिक, बौद्धिक आणि शारीरिक विकासावर परिणाम करत असल्याची चिंता व्यक्त करत प्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. निवृत्ती महाराज इंदुरीकर यांनी मुलांसह शिक्षकांनाही शाळेच्या वेळेत मोबाईल बंदीचा नियम लागू करण्याचे आवाहन केले आहे.



तसेच राज्यातील जिल्हा परिषद शाळा टिकवण्यासाठी प्रत्येक गावातील ग्रामसभेत ठोस निर्णय घेऊन शाळा व्यवस्थापन समित्यांनी कठोर अंमलबजावणी करावी, असे मत त्यांनी व्यक्त केले.

आष्टी तालुक्यातील घाटा (पिंपरी) येथे आयोजित गाथा पारायण सोहळा, श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ आणि अखंड हरिनाम सप्ताहानिमित्त रविवारी आयोजित कीर्तनप्रसंगी बोलताना इंदुरीकर महाराजांनी मोबाईलच्या अतिरेकी वापरामुळे मुलांमध्ये निर्माण होणाऱ्या समस्यांकडे लक्ष वेधले. त्यांनी सांगितले की, शाळकरी मुलांच्या हातात लहान वयात मोबाईल आल्याने त्यांच्या अभ्यासावरील लक्ष कमी होत असून मैदानी खेळ, वाचन संस्कृती आणि सामाजिक संवाद यांमध्ये घट होत आहे. परिणामी मुलांची एकाग्रता, स्मरणशक्ती आणि बौद्धिक क्षमता प्रभावित होत असल्याचे दिसून येत आहे. इंदुरीकर महाराज म्हणाले की, केवळ मुलांनीच मोबाईल वापरू नये असे सांगून चालणार नाही, तर शाळेच्या वेळेत शिक्षकांनीही मोबाईलपासून दूर राहणे आवश्यक आहे. वर्गात अध्यापन करताना शिक्षकांचे लक्ष मोबाईलकडे असल्यास विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर प्रतिकूल परिणाम होतो. शिक्षकांनी विद्यार्थ्यांसमोर आदर्श निर्माण करून शिक्षण प्रक्रियेला अधिक परिणामकारक बनविण्यासाठी मोबाईलचा मर्यादित वापर करणे गरजेचे आहे.

प्रत्येक गावातील ग्रामसभेत ठराव मंजूर करून शाळेच्या वेळेत विद्यार्थ्यांसह शिक्षकांना मोबाईल वापरावर निर्बंध घालावेत. शाळा व्यवस्थापन समितीने या नियमांची कठोर अंमलबजावणी करावी. पालकांनीही मुलांच्या हातात विनाकारण मोबाईल देणे टाळून त्यांना अभ्यास, संस्कार आणि मैदानी खेळांकडे वळवावे, असे स्पष्ट आवाहन त्यांनी केले.

राज्यातील जिल्हा परिषद शाळांची संख्या कमी होत चालल्याबद्दलही इंदुरीकर महाराजांनी चिंता व्यक्त केली. गावपातळीवरील राजकारण, पालकांचा घटता विश्वास आणि खासगी शिक्षणाकडे वाढणारा कल यामुळे अनेक जिल्हा परिषद शाळा बंद पडण्याच्या मार्गावर असल्याचे त्यांनी नमूद केले. जर ग्रामीण भागातील शाळा टिकल्या नाहीत, तर गरीब व सामान्य कुटुंबातील मुलांच्या शिक्षणावर गंभीर परिणाम होईल. त्यामुळे ग्रामस्थ, पालक, शिक्षक आणि स्थानिक लोकप्रतिनिधींनी एकत्र येऊन जिल्हा परिषद शाळा वाचवण्यासाठी प्रयत्न करणे काळाची गरज आहे, असे त्यांनी सांगितले.

कीर्तनादरम्यान त्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा योग्य वापर करण्यावर भर देत मोबाईल हे शिक्षणासाठी साधन असले तरी त्याचा अतिरेक घातक ठरू शकतो, असे सांगितले. मुलांनी मोबाईलच्या आहारी न जाता पुस्तके, अभ्यास, संस्कार, व्यायाम आणि मैदानी खेळ यांना प्राधान्य द्यावे, असेही त्यांनी उपस्थित पालकांना सांगितले. या कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवर, ग्रामस्थ, पालक आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये युवा नेते जयदत्त धस, समाजसेवक विजयकुमार गोल्हार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. इंदुरीकर महाराजांच्या या आवाहनाला उपस्थित नागरिक व पालकांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याचे दिसून आले.

# वारंवार होणाऱ्या वीजपुरवठा खंडितीमुळे नागरिक त्रस्त ;महावितरणच्या कारभारावर संताप

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) आष्टी तालुक्यात मागील काही दिवसांपासून वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे नागरिक हैराण झाले असून दैनंदिन जीवनावर त्याचा मोठा परिणाम होत आहे. शहरासह ग्रामीण भागात दिवसातून अनेकवेळा वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिकामध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर वीजपुरवठा सुरळीत राहण्याची गरज असताना सतत होणाऱ्या व्यत्ययामुळे नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे.



आष्टी शहरातील अनेक भागांसह ग्रामीण परिसरात वीजपुरवठा अचानक बंद होण्याच्या तक्रारी सातत्याने वाढत आहेत. कोणतीही पूर्वसूचना न देता तासन्तास वीजपुरवठा खंडित केला जात असल्याने नागरिकांना विविध अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी वीजपुरवठा खंडित झाल्यामुळे नागरिकांच्या झोपेचा खोळंबा होत असून लहान मुले, वृद्ध व्यक्ती आणि आजारी रुग्णांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. ग्रामीण भागातील परिस्थिती अधिक गंभीर बनली असून शेतीसाठी लागणाऱ्या वीजपुरवठ्यावरही परिणाम होत आहे. पिकांना पाणी देण्यासाठी विजेवर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांना मोटारी बंद राहिल्याने अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे शेतीचे नियोजन बिघडत असून उत्पादनावरही परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

वारंवार होणाऱ्या लोडशेडिंगसदृश परिस्थितीमुळे छोट्या-मोठ्या व्यावसायिकांनाही आर्थिक फटका बसत आहे. वेल्डिंग दुकाने, पिठ गिरण्या, सलून, किरकोळ दुकानदार तसेच विविध लघुउद्योगांचे कामकाज ठप्प होत असून व्यवसायावर विपरीत परिणाम होत असल्याची तक्रार व्यापाऱ्यांनी केली आहे. अनेक व्यावसायिकांना जनरेटर किंवा पर्यायी साधनांचा वापर करावा लागत असल्याने अतिरिक्त खर्चही सहन करावा लागत आहे.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक तयारीवरही या समस्येचा परिणाम दिसून येत आहे. सध्या विविध स्पर्धा परीक्षा, शालेय व महाविद्यालयीन अभ्यासाच्या तयारीचा काळ सुरू असून अचानक खंडित होणाऱ्या वीजेमुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासात व्यत्यय निर्माण होत आहे. रात्री अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना विशेषतः मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

दरम्यान, महावितरणकडून तांत्रिक बिघाड, दुरुस्ती कामे, देखभाल तसेच वाढलेला वीजवापर यामुळे काही वेळा वीजपुरवठा खंडित होत असल्याचे सांगितले जात आहे. मात्र नागरिकांच्या मते वारंवार आणि अनियमित पद्धतीने वीजपुरवठा खंडित होणे ही गंभीर बाब असून याबाबत ठोस उपाययोजना करणे आवश्यक आहे. नागरिकांनी महावितरण प्रशासनाने नियोजित देखभाल किंवा दुरुस्ती असल्यास पूर्वसूचना द्यावी, तसेच नियमित व सुरळीत वीजपुरवठा सुनिश्चित करावा, अशी जोरदार मागणी केली आहे. अन्यथा नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागेल, असा इशाराही काही ठिकाणी नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

# राज्यस्तरीय पंजाबराव देशमुख ओबीसी रत्न पुरस्काराने पीएम श्री शाळा टाकळसिंगचे आदर्श मुख्याध्यापक महेशकुमार शिंदे यांचा होणार भव्य सन्मान

## शिक्षक पतसंस्थेचे सचिव महेशकुमार शिंदे यांच्या कार्याचा राज्यस्तरावर सन्मान

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) पीएम श्री जिल्हा परिषद माध्यमिक शाळा टाकळसिंग, ता. आष्टी, जि. बीड येथील आदर्श मुख्याध्यापक तथा स्वामी विवेकानंद शिक्षकांची सहकारी पतसंस्थेचे सचिव महेशकुमार शिंदे यांच्या शैक्षणिक, सामाजिक, संघटनात्मक आणि नेतृत्वगुणांमधील उल्लेखनीय योगदानाची दखल घेत प्रतिष्ठेचा राज्यस्तरीय पंजाबराव देशमुख ओबीसी रत्न पुरस्कार दिनांक ५ जून २०२६ रोजी प्रमुख मान्यवरांच्या शुभहस्ते पनवेल येथे प्रदान करण्यात येणार आहे. शिक्षण क्षेत्रात विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी, शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी आणि शिक्षक हितासाठी सातत्याने झटणाऱ्या एका समर्पित शिक्षकाला मिळालेला हा गौरव मानला जात असून, त्यांच्या या यशाबद्दल संपूर्ण तालुक्यात अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे, त्यांच्यात स्पर्धात्मकता, शिस्त, सामाजिक जाणीव आणि आत्मविश्वास निर्माण व्हावा या उद्देशाने महेशकुमार शिंदे यांनी गेल्या अनेक वर्षांपासून शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य उभे केले आहे. मुख्याध्यापक म्हणून त्यांनी केवळ शाळेच्या प्रशासकीय जबाबदाऱ्या पार पाडल्या नाहीत, तर एक दूरदृष्टी असलेले शैक्षणिक नेतृत्व म्हणून शाळेच्या विकासाची भक्कम पायाभरणी केली आहे.

टाकळसिंग येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळा ही आज तालुक्यात वेगळी ओळख निर्माण करू शकली आहे, त्यामागे शिंदे सरांचे नियोजन, अभ्यासू वृत्ती, सकारात्मक नेतृत्व आणि सातत्यपूर्ण मेहनत असल्याचे सहकारी शिक्षक व पालक सांगतात. त्यांच्या नेतृत्वाखाली शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेत सातत्याने वाढ झाली असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला नवे आयाम मिळाले आहेत. विशेष म्हणजे, विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे आणि ग्रामीण भागातील शाळेलाही आधुनिक सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी त्यांनी मोठ्या प्रमाणावर प्रयत्न केले. त्यांच्या नेतृत्वाखाली शाळेला पीएम श्री योजनेत स्थान मिळाले. या योजनेच्या माध्यमातून शाळेला गुणवत्तापूर्ण शिक्षण, आधुनिक शैक्षणिक सुविधा, तंत्रज्ञानाधारित अध्यापन, कौशल्यविकास, डिजिटल साधने आणि नाविन्यपूर्ण शिक्षणपद्धती यांचा लाभ मिळू लागला आहे. याशिवाय, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेत शाळेची निवड होण्यासाठीही त्यांनी सहकारी शिक्षकांच्या मदतीने सातत्यपूर्ण प्रयत्न केले. शाळेच्या उन्नतीसाठी केलेले नियोजन, शासनाच्या विविध योजना प्रभावीपणे राबविण्याची क्षमता आणि विकासाभिमुख दृष्टीकोन यामुळे शाळेच्या विकासाला नवी चालना मिळाली आहे. शाळेतील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी त्यांनी अनेक प्रभावी उपक्रम सुरू केले. विद्यार्थ्यांच्या अभ्यासातील कमतरता लक्षात घेऊन अतिरिक्त मार्गदर्शन वर्ग, सराव परीक्षा, प्रश्नसंच सोडविणे, विशेष अभ्यास शिबिरे, पालक-शिक्षक संवाद, विद्यार्थ्यांचे वैयक्तिक मार्गदर्शन, नियमित मूल्यमापन आणि शिक्षकांमध्ये समन्वय निर्माण करण्यावर त्यांनी विशेष भर दिला. परिणामी, यावर्षी इयत्ता दहावीचा निकाल अत्यंत उत्कृष्ट लागला असून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत लक्षणीय सुधारणा दिसून आली आहे.महेशकुमार शिंदे यांचा विश्वास आहे की, विद्यार्थ्यांचा विकास केवळ पाठ्यपुस्तकापुरता मर्यादित नसून त्यांच्यात संस्कार, नेतृत्वगुण, आत्मविश्वास आणि सामाजिक मूल्ये निर्माण होणेही तितकेच




महत्त्वाचे आहे. त्यामुळे त्यांनी विद्यार्थ्यांना विविध स्पर्धा परीक्षा, विज्ञान प्रदर्शन, सांस्कृतिक कार्यक्रम, क्रीडा उपक्रम, वाचन संस्कृती, भाषण स्पर्धा, निबंध स्पर्धा आणि सामाजिक उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित केले. ग्रामीण भागातील पालकांमध्ये शिक्षणाबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी त्यांनी प्रत्यक्ष गावोगावी जाऊन पालकांशी संवाद साधला. आपल्या मुलांनी शिकले पाहिजे, मोठे झाले पाहिजे आणि स्पर्धेच्या युगात टिकले पाहिजे, हा संदेश त्यांनी पालकांपर्यंत पोहोचविला.

शाळेची पटसंख्या वाढविण्यासाठी त्यांनी वैयक्तिक पातळीवर मोठे प्रयत्न केले. परिणामी पालकांमध्ये शाळेविषयी विश्वास निर्माण झाला असून शाळेच्या प्रवेश संख्येतही सकारात्मक बदल दिसून येत आहे.शाळेच्या भौतिक सुविधांमध्ये सुधारणा करण्यासाठीही त्यांनी विशेष पुढाकार घेतला. विद्यार्थ्यांना चांगले शैक्षणिक वातावरण मिळावे यासाठी वर्गखोल्यांचे सुशोभीकरण, शिस्तबद्ध वातावरण, स्वच्छता, अध्ययनपूरक साधनसामग्री, डिजिटल शिक्षण आणि नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धतीवर त्यांनी विशेष भर दिला. त्यामुळे शाळेचा परिसर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी वातावरण निर्माण करणारा ठरला आहे. महेशकुमार शिंदे हे केवळ आदर्श मुख्याध्यापक नाहीत, तर शिक्षकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने आवाज उठविणारे, त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणारे आणि शिक्षक हितासाठी संघटनात्मक स्तरावर काम करणारे प्रभावी नेतृत्व म्हणूनही ओळखले जातात. शिक्षकांच्या अडचणी शासन दरबारी मांडणे, प्रशासकीय अडथळे दूर करण्यासाठी पाठपुरावा करणे, शिक्षकांना योग्य मार्गदर्शन करणे आणि शैक्षणिक वातावरण सकारात्मक ठेवण्यासाठी प्रयत्नशील राहणे हे त्यांच्या कार्याचे वैशिष्ट्य मानले जाते.स्वामी विवेकानंद शिक्षकांची सहकारी पतसंस्थेचे सचिव म्हणून त्यांनी संस्थेच्या कामकाजात पारदर्शकता, शिस्त आणि विश्वासार्हता निर्माण केली आहे. शिक्षकांच्या आर्थिक अडचणी सोडविण्यासाठी, त्यांना सहकार्य मिळावे आणि शिक्षक कुटुंब अधिक सक्षम व्हावे यासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. सहकारी क्षेत्रातील त्यांच्या कामाचीही शिक्षकांमध्ये मोठी प्रशंसा केली जाते. तालुक्यातील विविध शिक्षक संघटनांच्या कार्यक्रमांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग असतो. शिक्षकांचे प्रश्न सोडविणे, त्यांच्या सुखदुःखात सहभागी होणे, प्रत्येक सामाजिक आणि शैक्षणिक उपक्रमात उपस्थित राहणे, शिक्षकांना एकत्र आणणे आणि संघटन मजबूत करणे यामुळे शिक्षकांमध्ये त्यांच्याविषयी आत्मीयता आणि विश्वास निर्माण झाला आहे. संकटात धावून येणारे शिक्षक नेते अशी त्यांची तालुकाभर ओळख आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील साधेपणा, समन्वयाची भूमिका, संवादकौशल्य, निर्णयक्षमता आणि सर्वांना सोबत घेऊन चालण्याची वृत्ती यामुळे ते शिक्षक, विद्यार्थी, पालक आणि समाजामध्ये लोकप्रिय झाले आहेत. कठोर परिश्रम, शिस्तप्रियता आणि शिक्षणाबद्दलची निष्ठा ही त्यांच्या कार्याची खरी ताकद मानली जाते.राज्यस्तरीय पंजाबराव देशमुख ओबीसी रत्न पुरस्कार मिळाल्याने केवळ महेशकुमार शिंदे यांचाच गौरव झालेला नसून ग्रामीण शिक्षण व्यवस्थेत कार्यरत असलेल्या समर्पित शिक्षकांचा सन्मान झाल्याची भावना व्यक्त केली जात आहे. शिक्षण क्षेत्रात प्रामाणिकपणे काम करणाऱ्यांना समाज आणि राज्यस्तरावर योग्य मान्यता मिळते, याचे हे प्रेरणादायी उदाहरण असल्याचे मत विविध शिक्षक संघटना, शिक्षणप्रेमी नागरिक आणि पालकांनी व्यक्त केले आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल तालुक्यातील शिक्षक, विद्यार्थी, पालक, सामाजिक कार्यकर्ते, शिक्षणप्रेमी नागरिक तसेच विविध शिक्षक संघटनांकडून महेशकुमार शिंदे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, भविष्यातही त्यांच्या नेतृत्वातून शाळा आणि शिक्षण क्षेत्रात अनेक नाविन्यपूर्ण व प्रेरणादायी कार्य घडेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# यशाचा मनसोक्त आनंद घेण्यासाठी अपयश आणि कठीण परिस्थिती गरजेची

स्वतःच्या मनावर इतका ताबा असायला हवा कि परिस्थिती किती ही वाईट असली तरी नेहमी स्वतःबद्दल आणि इतरांबद्दल चांगलाच विचार करता आला पाहिजे. आपण इतरांना समजावताना खुप छान समजावतो. स्वतः समजून घेतांना मात्र स्वार्थाचा पडदा दुर करू शकत नाहीत हेच परम सत्य आहे .आयुष्यभर पैशाच्या मागे धावून मोठं सुंदर घर घेणारी माणसं मनशांतीसाठी मात्र त्याच घरापासून लांब कुठे तरी जातात. चांगल्या गोष्टी घडत नसतात त्या घडवाव्या लागतात, त्यासाठी योग्य वेळी योग्य ते निर्णय घ्यावे लागतात. केलेले उपकार, दिलेला शब्द आणि उपयोगी पडलेली माणसं कधीही विसरायची नसतात. आळशी लोकं नशिबाची वाट पाहतात, कष्टाळू माणसं नशिबाला घडवतात, अडाणी माणूस दुसऱ्याला दोष देतो, शहाणा माणूस आपले दोष शोधतो, सुशिक्षित माणूस पैशाला महत्त्व देतो आणि सुसंस्कृत माणूस माणुसकीला महत्त्व देतो. वर्तमानातूनच सुख वेचण्याचा प्रयत्न करा भविष्य फार धूर्त आहे ते फक्त आश्वासन देतं खात्री नाही. स्वतः चं मन शांत करता आले की, सगळे गोंधळ आपोआप शांत होतात .यशाचा मनसोक्त आनंद घेण्यासाठी अपयश आणि कठीण परिस्थिती यांची अत्यंत गरज असते. जीवनात स्वतःची तुलना कधीच इतरांसोबत करू नका कारण प्रत्येकाचा जीवन प्रवास हा वेगळा असतो .त्यामुळे प्रत्येक व्यक्तीच्या समस्याही वेगळ्या असतात, तुलना करायचीच असेल ना तर तुमच्या कालची आजच्या दिवसासोबत करा ती तुम्हाला नक्कीच पुढे नेईल आणि यशस्वी बनवेल .यशस्वी माणूस होण्यापेक्षा जीवनात उपयोगी पडणारा माणूस बना. तुम्ही नक्कीच पुढे जाल सत्य आणि स्पष्ट बोलणारा कडू वाटत असला तरी तो धोकेबाज कधीच नसतो. यशाचा मनसोक्त आनंद घेण्यासाठी अपयश आणि कठीण परिस्थिती यांची अत्यंत गरज असते .वेळ लागला तरी चालेल पण आयुष्यात काही तरी बनून दाखवा कारण लोक भेटल्यावर तू कसा आहेस ? हे विचारत नाही तर तू काय करतोस हे विचारतात. माणसाला संपत्तीने फक्त सुविधा मिळतात पण समाधान व सुख नाही. सुख आणि स्वास्थ्य मिळविण्यासाठी आपसातील प्रेम आणि आपल्यांची साथ असणे अत्यंत गरजेचे असते. सरळ सरळ जे आहे ते सांगण्याचं धैर्य आपल्यात हवं त्यातून जी नाती टिकतील ती टिकतील, जे सोडावं लागेल तिथं इलाज नाही, काहीही चूक नसताना ज्या जखमा मिळतात त्या सर्वात जास्त त्रासदायक असतात. देव ज्या लोकांना धनदौलत कमी देतो त्या लोकांना मन मात्र मोठं देतो जगात खाण्यासारखा दुसरा आनंद नाही. पंचपक्कान्नापासून पाणीपुरी पावभाजीपर्यंत जे निरनिराळे शोध लागत गेले ते खाणाऱ्या माणसांमुळे डाएटिंग करणाऱ्यांमुळे नाही सुगंध हा फक्त फुलांनाच नसतो तर तो माणसांच्या शब्दांनाही असतो फक्त तो पसरवता आला पाहिजे. सेवा सगळ्यांची करा पण अपेक्षा कोणाकडुनही करू नका ,कारण सेवेची खरी परतफेड परमेश्वरच करू शकतो. माणुस नाही बऱ्याचदा आपल्या आयुष्यात काही नाती अशी असतात की त्यांना कुठल्याच नात्याच्या नावात बसवता येत नाही पण त्या व्यक्तीसाठी एक हळवा कप्पा हृदयात आणि पापणी आड कायम राखीव असतो. सत्याला पाय असतात म्हणून ते पाय रोवून ठामपणे उभं असतं तर अफवांना पाय नसतात म्हणून त्या पसरत असतात. प्रामाणिक व्यक्तीची किंमत कधीच वेळेआधी समजत नाही त्यांची किंमत एक तर वेळ आल्यावर समजते नाही तर वेळ निघून गेल्यावरच समजते.



शिक्षक आणि रस्ता दोन्ही एक सारखेच असतात, स्वतः जिथं आहेत तिथेच राहतात मात्र दुसऱ्यांना त्यांच्या यशाकडे नेतात .आपण ज्याची इच्छा करतो प्रत्येक वेळी तेच आपल्याला मिळेल असे नाही परंतु नकळत बऱ्याच वेळा आपल्याला असे काही तरी मिळते ज्याची कधीच अपेक्षा नसते यालाच आपण केलेल्या चांगल्या कामाबद्दल मिळालेले आशीर्वाद असे म्हणतो. शरिराचे सगळे अवयव असून सुद्धा माणसाच्या मनाला जेव्हा अपंगत्व येतं तेंव्हा त्या माणसाला ह्या जगातील कोणतीच सर्जरी वाचवू शकत नाही. नातं तेच टिकते ज्यात शब्द कमी आणि समज जास्त, तक्रार कमी आणि प्रेम जास्त अपेक्षा कमी आणि विश्वास जास्त असतो. कुणाची कितीही मोठी चूक असली तरी ती आयुष्यापेक्षा व नात्यापेक्षा मोठी नाहीच आवडलेलं आणि निवडलेलं यांची जेव्हा सांगड घालता येत नाही तेव्हा आयुष्यात उरते ती फक्त तडजोड .कारण आवडलेलं कधी आपल्याला विसरता येत नाही आणि निवडलेलं मनापासून स्वीकारता येत नाही. कमळाच्या पानाला पाणी चिकटत नाही त्याप्रमाणेच स्वत:वर ताबा ठेवणाऱ्या लोकांना मोह आसक्ती या गोष्टी चिकटत नाहीत संगत करावी तर स्वच्छ चारित्र्य, निस्वार्थी मन, स्वच्छ विचार, सहकार्य करण्याची भावना आणि सुख दु:खात धावुन येणारांशी करा, कारण अशी माणसं तुमच्या प्रगतीच्या आड कधीच येत नाहीत. हास्य ही निसर्गाची देणं नसून काही प्रमाणात आपल्या आत दडलेल्या समाधानाचं सुखाचं प्रतिबिंब आहे जे सहज मिळतं ते शेवट पर्यंत टिकत नाही आणि जे शेवट पर्यंत टिकतं ते सहज मिळत नाही.

सौ माधुरी कुलकर्णी जामनेर
संस्थापिका सचिव वसुनंदिनी फाउंडेशन



## जगामध्ये एकच मंडप आहे त्या ठिकाणी जातीभेद होत नाही तो म्हणजे वारकरी संप्रदाय- हभप गवारे महाराज

तलवाडा : प्रतिनिधी गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील महारुद्र हनुमान महाराज मंदिर या ठिकाणी अधिक मासा निमित्ताने हभप गु.महंत मधुसूदन महाराज गवारे यांच्या गोड वाणी पुरूषोत्तम संकट मोचन महारुद्र हनुमान कथेचे आयोजन करण्यात आले होते त्याच प्रसंगी दिनांक २४, ५, २०२६ रोजी या कथेची सांगता ह भ प गवारे महाराज यांच्या कीर्तनाच्या माध्यमातून कथेची सांगता झाली आहे सर्व भावी भक्तांना महाप्रसाद मोठ्या उत्साहामध्ये वाटप करण्यात आले आहे याच कीर्तनामध्ये ह भ प गवारे महाराज यांच्या हस्ते पुढच्या वर्षी हनुमंत रायाच्या जयंतीच्या निमित्ताने मोठ्या उत्साहामध्ये अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा आयोजित करण्यात येणार आहे याकरता मानाचं श्रीफळ गवारे महाराज यांनी गावकऱ्यांना दिले आहे..यावेळी उपस्थित मा श्री सुरेश हात्ते साहेब सरपंच विष्णू तात्या हात्ते पत्रकार आर आर बहिर ह भ प विकास महाराज मुटके ह भ प नाना महाराज कवडे ह भ प सारंग महाराज ह भ प गणेश महाराज कचरे हभप दत्ता महाराज शिंगणे ह भ प कल्याण महाराज राऊत ह भ प नवनाथ भामरे माननीय श्री राजाभाऊ ख्रिस्ते माननीय श्री शरद रावजी देशमुख विनोद हातागळे व तलवाडा व तलवाडा परिसरातील गुंजन मंडळी युवक नागरिक महिला मंडळ त्वरिता तरुण मंडळ समस्त मेडिकल यांचे सदस्य सर्व डॉक्टर मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आदर्श शिक्षक तथा कवी,वात्रटिकाकार मधुचंद्र राऊत यांना जीवन गौरव पुरस्कार जाहीर

## ग्रामीण मातीतून उमललेल्या शब्दसम्राटाचा राज्यस्तरीय गौरव

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील कडा या ग्रामीण भागातील मातीतून आपल्या लेखणीच्या जोरावर राज्यभर वेगळी ओळख निर्माण करणारे आदर्श शिक्षक तथा ज्येष्ठ वात्रटिकाकार, कवी, भाष्यकवी व साहित्यिक मधुचंद्र राऊत यांना साहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल प्रतिष्ठेचा जीवन गौरव पुरस्कार जाहीर झाला असून त्यांच्या या निवडीमुळे साहित्यविश्वासह बीड जिल्ह्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. श्री शंभुकलश काव्यसंस्था व सामाजिक प्रतिष्ठान, महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने हा सन्मान प्रदान करण्यात येणार आहे.

संस्थेचे संस्थापक सचिव संदीप पाचारणे, कार्याध्यक्ष अनिकेत अवसरमल यांच्या स्वाक्षरीने पाठविण्यात आलेल्या अधिकृत निवडपत्रानुसार, दिनांक ३१ जानेवारी २०२६ रोजी अहिल्यानगर येथे आयोजित श्री शंभुकलश काव्यकरंडक स्पर्धा व दुसरे राज्यस्तरीय काव्यसंमेलन साहित्य मेळाव्यात मधुचंद्र राऊत यांना हा पुरस्कार प्रदान केला जाणार आहे. संस्थेच्या कार्यकारी मंडळाने त्यांच्या साहित्यिक, शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातील योगदानाचा गौरव करण्यासाठी सर्वानुमते ही निवड केली आहे. विशेष म्हणजे, काव्यसंमेलनात उपस्थित राहून नवोदित कवी-कवयित्रींना मार्गदर्शन करण्याचे निमंत्रणही त्यांना देण्यात आले आहे.

ग्रामीण भागात जन्म घेऊन जीवनातील संघर्ष, सामाजिक विसंगती, राजकीय उपरोध, मानवी स्वभाव, दुःखातील विनोद आणि सामान्य माणसाच्या जगण्याला शब्द देणारे मधुचंद्र राऊत यांनी आपल्या वैशिष्ट्यपूर्ण लेखनशैलीतून वाचकांच्या मनात अढळ स्थान निर्माण केले आहे. साधी, सहज आणि ग्रामीण बोलीभाषेतील ताकदवान शब्दरचना, विनोदातून मार्मिक टोलेबाजी आणि वास्तवावर थेट भाष्य करण्याची शैली यामुळे त्यांची कविता व वात्रटिका रसिकांच्या विशेष पसंतीस उतरली आहे.

मधुचंद्र राऊत यांनी आपल्या साहित्यप्रवासात ग्रामीण समाजातील वास्तव, नातीगोती, शेतकऱ्यांच्या वेदना, राजकीय ढोंग, सामाजिक विसंगती, बदलते संस्कार आणि माणसांच्या भावविश्वाचे विविध पैलू प्रभावीपणे शब्दबद्ध केले आहेत. त्यांनी भाष्यकविता आणि वात्रटिकांच्या माध्यमातून अनेक मोठमोठ्या राजकीय व्यक्तिमत्त्वांवर उपरोधिक शैलीत भाष्य करत समाजातील प्रश्न अधोरेखित केले. त्यामुळे त्यांची ओळख केवळ कवी म्हणूनच नव्हे, तर जनमानसातील प्रश्नांना लेखणीच्या माध्यमातून आवाज देणारे साहित्यिक म्हणून निर्माण झाली. त्यांच्या साहित्यिक जीवनातील एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे प्रकाशित झालेले ठसका हे पुस्तक होय. या पुस्तकातील वात्रटिका, व्यंगात्मक शैली, सामाजिक संदेश आणि ग्रामीण वास्तवाची झलक यामुळे ठसका ने साहित्य क्षेत्रात स्वतंत्र ओळख निर्माण केली. या पुस्तकाला वाचक, रसिक आणि साहित्यप्रेमींनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला असून अनेक मान्यवरांनी त्याचे कौतुक केले आहे. सुप्रसिद्ध व्यंगचित्रकारांनीही या साहित्यकृतीचे कौतुक करत शब्द आणि व्यंग यांचा प्रभावी संगम असल्याचे मत व्यक्त केले आहे.

विशेष म्हणजे, स्वतःच्या आयुष्यातील संघर्ष, अभाव, सामाजिक चढउतार आणि जीवनातील कटू-गोड अनुभवांना त्यांनी आपल्या लेखणीतून जिवंत केले आहे. ग्रामीण भागातील पारंपरिक जीवन, माणसांचे भावविश्व, हास्य-विनोदातील सामाजिक वास्तव आणि संघर्षातील आशावाद यांचे प्रभावी चित्रण त्यांच्या कवितांमध्ये आढळून येते. त्यामुळे त्यांच्या लेखणीतून उमटलेले शब्द सामान्य माणसाच्या हृदयाला थेट भिडतात.

राज्यभरातील विविध काव्यसंमेलने, साहित्यिक मेळावे, सांस्कृतिक व्यासपीठे आणि सामाजिक कार्यक्रमांमध्ये मधुचंद्र राऊत यांनी प्रभावी सादरीकरणातून रसिकांची मने जिंकली आहेत. त्यांच्या कविता आणि वात्रटिकांना ग्रामीण भागापासून शहरांपर्यंत प्रचंड प्रतिसाद मिळाला आहे. लहानांपासून थोरांपर्यंत, सामान्य रसिकांपासून साहित्यिकांपर्यंत सर्वांनी त्यांच्या लेखनाला दाद दिली आहे. त्यांच्या शब्दांतून व्यक्त होणारे सामाजिक भान आणि मार्मिक विनोद ही त्यांची खरी ताकद मानली जाते.

जीवन गौरव पुरस्कारासाठी झालेली त्यांची निवड ही केवळ एका साहित्यिकाचा गौरव नसून कडा गाव, आष्टी तालुका आणि संपूर्ण बीड जिल्ह्याच्या सांस्कृतिक व साहित्यिक परंपरेचा सन्मान असल्याची भावना व्यक्त होत आहे. त्यांच्या या यशामुळे ग्रामीण भागातील नवोदित साहित्यिकांनाही प्रेरणा मिळणार असल्याचे साहित्य क्षेत्रातील मान्यवरांनी सांगितले.

आष्टी तालुक्यामध्ये गेल्या तीस वर्षापासून अनेक व्यासपीठ व काव्य संमेलने गाजवणारे मधुचंद्र राऊत गेल्या अनेक वर्षापासून अर्धांगवायू या गंभीर आजाराने त्रस्त आहेत. त्यांना गेल्या दहा ते बारा वर्षापासून घरातून उठता बसताही येत नाही. परंतु त्यांनी त्यांच्या हयातीमध्ये अनेक काव्य संमेलने गाजवून रसिकांची मने जिंकण्याचे काम केले. मात्र गेल्या काही वर्षांपूर्वी त्यांना अर्धांगवायूचा झटका झाला आणि घरातच एका जागेवर बसून राहावे लागले. दरम्यान, मधुचंद्र राऊत यांच्या या राज्यस्तरीय सन्मानाबद्दल साहित्यप्रेमी, मित्रपरिवार, सामाजिक कार्यकर्ते, कवी, शिक्षक, विविध संघटनांचे पदाधिकारी तसेच कडा व परिसरातील



नागरिकांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, आगामी काळातही त्यांच्या लेखणीतून समाजमनाला दिशा देणारे साहित्य निर्माण व्हावे, अशा शुभेच्छा व्यक्त केल्या जात आहेत.

# किनवटमध्ये गोवंश हत्या बंदी कायद्याच्या कडक अंमलबजावणीची मागणी; विविध संघटनांचे पोलीस निरीक्षकांना निवेदन



किनवट /प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाने राज्यातील गोवंश हत्या बंदी कायद्याच्या कडक अंमलबजावणीसाठी नुकतेच जारी केलेल्या नवीन शासन परिपत्रकाची काटेकोर अंमलबजावणी करावी, तसेच गोवंशाची अवैध वाहतूक व कत्तल करणाऱ्यांविरुद्ध कठोर गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी विविध हिंदुत्ववादी व सामाजिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी पोलीस स्टेशन किनवटचे पोलीस निरीक्षक गणेश कराड यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाने दिनांक २१ मे २०२६ रोजी शासन परिपत्रक क्रमांक एमआयएस-०५२६/प्र.क्र. ५६/ विशा-१ब जारी करून राज्यातील गोवंश संरक्षण कायद्याची कठोर अंमलबजावणी करण्याचे आदेश सर्व पोलीस प्रशासनाला दिले आहेत. शासनाने स्वदेशी गायीला 'राज्यमाता'चा दर्जा दिल्यानंतर गोवंश हत्या व अवैध वाहतुकीवर पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे. मात्र, काही तस्कर आणि समाजकंटक छुप्या मार्गाने गोवंशाची अवैध वाहतूक व कत्तल करत असल्याचे प्रकार अजूनही समोर येत असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. अशा बेकायदेशीर कृत्यांमुळे प्राणी कल्याण कायद्यांचे उल्लंघन होत असून धार्मिक भावना दुखावल्या जात आहेत. त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. गृह विभागाच्या नव्या शासनादेशानुसार पोलीस प्रशासनाने अधिक सतर्क राहून गोवंश संरक्षण कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच, आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व पोलीस ठाण्यांना नवीन शासन परिपत्रकानुसार तातडीने व कठोर कारवाई करण्याचे आदेश द्यावेत, अशी विनंती पोलीस निरीक्षकांना करण्यात आली आहे. गोवंश रक्षण हाच आमचा संकल्प असा उल्लेख करत या निवेदनावर विहिंपचे जिल्हा मंत्री संतोष रायेवार, कोषाध्यक्ष शिवराज चाडावार, शहर मंत्री जयंत मच्छर्लावार, भाजप शहर मंडळ अध्यक्ष स्वागत आयनेनीवार, उत्तर मंडळ अध्यक्ष उमाकांत पाटील क-हाळे, सरचिटणीस बाळकृष्ण कदम, रोहित चाडावार, आदित्य कलकुंटावार, क्षितिज रापणवार, अमरनाथ हुसे, अजय जाटवे, साहिल जाधव, शिवराज गुंजकर, राघव बोकारे, शैलेश वासुदेव, रितीकेश डोनेराव, अविनाश सल्लेवाड, किरण रेनीवार, साईराम भवरे, समर्थ कदम, राहुल खंडे, विश्वजीत मिसलवार, दर्शन बरबडकर, आशिष पवार, योगेश गोपनवाड, संस्कार गायकवाड, रोहित भगत, जयराज वर्मा, नरसिंग तक्कलवार, सतीश बिराजदार, कृष्णा कलकूठलावार, प्रा. विश्वास कोल्हारीकर व्यंकट भातनासे, सुनिल मच्छेवार, गोपाल कटकमवार, बालाजी बच्चेवार, अनिश राजुरकर, अक्षय राजुरकर, अजय सुर्यवंशी, रविकांत सटलावार, कृष्णा कदम, संजय सोनी आदींसह अनेकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# पत्रकारांच्या हितासाठी सदैव कटिबद्ध.. आ. बाबुराव कदम

हदगाव हिमायतनगर विधानसभा क्षेत्रात पत्रकार बांधवांचे जीवन सुरक्षा कवच म्हणून विमा काढण्यासाठी पुढाकार.



तामसा (प्रतिनिधी ) हदगाव हिमायतनगर विधानसभा क्षेत्रात सर्व पत्रकार बांधवांच सुरक्षा कवच म्हणून जीवन विमा काढण्यासाठी कटिबद्ध असल्याची गवाही हदगाव हिमायतनगर तालुक्याचे आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांनी तामसा येथे आयोजित पत्रकारांच्या सत्कार व परिषद मेळाव्यात अध्यक्ष स्थानी उपस्थित असलेले आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांनी आयोजित कार्यक्रमात पत्रकाराच्या सुरक्षा संबंधी येणारे अडचणी, दिवंगत झालेले पत्रकारांच्या कुटुंबाला आर्थिक प्रोत्साहन, सरसेनापती नेताजी पालकर पुरस्कार दीपक सूर्यवंशी, शेख चांद पाशा, स. द. कल्याणे, रामेश्वर बोरकर तसेच द सिम्बॉल ऑफ नॉलेज डॉ बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार, दर्पणकार बाल शास्त्री जांभेकर पुरस्कार, डॉ. एपीजे अब्दुल कलाम गुणवंत विद्यार्थी पुरस्कार दहावी व बारावी, नवोदय, गुणवंत विद्यार्थी ज्येष्ठ पत्रकारांच्या संपत्नीक सत्कार आणि पत्रकारांच्या कौटुंबिक धोंडे जेवण चा कार्यक्रम संपन्न झाला कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून विधानसभा क्षेत्राचे आमदार बाबुराव कदम कोहळीकर होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय राहुलवार यांनी केले तर आभार आयोजक बाळासाहेब खानजोडे यांनी मानले कार्यक्रमात हदगाव हिमायतनगर तालुक्यातील ज्येष्ठ,श्रेष्ठ, वर्तपत्र विक्रेता मोठ्या संख्येने उपस्थित होते. हदगाव हिमायतनगर विधानसभा क्षेत्रात सर्व पत्रकार बांधवांच जीवन बीमा काढण्यासाठी आमदार यांनी पुढाकार घेतला असून सर्व पत्रकार बांधवांनी विमा साठी लागणाऱ्या कागदपत्रे तयार करून आमदार यांच्या कार्यालयात जमा करण्याच आवाहन अंदर कोहळीकर यांनी केले येणारा सर्व खर्च आमदार स्वतः करणार अशी गहावी दिली. दिवंगत पत्रकार यांना आदरांजली वाहण्यात आली

# देगाव शिवारात साई पेट्रोलपंपाजवळ निळकंठेश्वर ट्रॅव्हल्सने दोन मोटारसायकल स्वाराला फरपटत नेले



दोघेही प्रकुती चिताजनक

नायगाव शहरालगत देगाव शिवारातील साई पेट्रोलपंपाजवळ मंगळवारी सकाळी साडेदहा ते अकराच्या सुमारास काळाने घाला घातला. भरधाव वेगाने देगलूर-नांदेड धावणाऱ्या निळकंठेश्वर खाजगी ट्रॅव्हल्सने रस्ता ओलांडणाऱ्या दुचाकीस्वारांना जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की दोघांना ट्रॅव्हल्सने जवळपास १०० मीटर फरफटत घासत नेले या भीषण अपघातात देगाव येथील पप्पू बालाजी विभुते, वय ४५ असुन माधव चिंचलवाड, वय ४७ हे दोघे गंभीर जखमी झाले आहेत. माधव चिंचलवाड यांची प्रकृती चिंताजनक असून डोक्याला व छातीला पायाला गंभीर मार लागला आहे. जोरदार लागल्याने पप्पू विभुते ची तब्येत गंभीर व चिंताजनक असल्याचे बोलण्यात येत आहे दोघांनाही तत्काळ शासकीय रुग्णालय, विष्णुपुरी, नांदेड येथे हलविण्यात आले आहे.

नायगाव तालुक्यात जवळपास दहा ते पंधरा खाजगी ट्रॅव्हल्स कंपन्या मुखेड-नांदेड व देगलूर-नांदेड मार्गावर धावतात. प्रवासी मिळवण्यासाठी या ट्रॅव्हल्सचालकांमध्ये जीवघेणी स्पर्धा लागते. प्रत्येक वाहनाला ओव्हरटेक करत, भरधाव वेगाने गाड्या हाकल्या जातात. एसटी बसला प्रवासी मिळू नयेत म्हणून ट्रॅव्हल्सवाले जीव धोक्यात घालून गाड्या पळवतात, असा आरोप स्थानिक नागरिक करीत आहेत.

आर टी ओ सह पोलीस प्रशासनावर गंभीर आरोप करण्यात येत आहेत आर.टी.ओ. विभागाच्या हप्तेखोरीमुळेच या ट्रॅव्हल्सचा बेलगाम कारभार सुरू आहे. फिटनेस, स्पीड गव्हर्नर, विमा तपासला जात नाही. स्थानिक पोलीस प्रशासनही या प्रकाराकडे जाणीवपूर्वक काना डोळा करते,' असा संतप्त आरोप अपघातग्रस्तांच्या नातेवाईकांनी केला आहे.

अपघातात दुखापत झालेल्या व्यक्तीच्या परिवाराकडून ट्रॅव्हल्स मालक व चालका विरोधात गंभीर गुन्हे दाखल करण्यात यावे अशी मागणी होत आहे अपघाताची माहिती मिळताच देगाव व परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी व रुग्णालयात मोठी गर्दी केली. 'सदोष मनुष्यवधाचा गुन्हा नको, थेट ३०२ चा खुनाचा गुन्हा दाखल करा. चालकाचे लायसन्स कायमचे रद्द करून त्याला व ट्रॅव्हल्सच्या मालकाला तात्काळ अटक करा,' अशी मागणी माधव चिंचलवाड व पप्पू विभुते यांच्या कुटुंबीयांनी केली आहे.

# तामसा उपबाजार समितीत शेतकऱ्यांवर अन्याय ?

## हळद व्यापारात पारदर्शकतेचा अभाव; व्यापारी-अधिकाऱ्यांच्या आर्थिक तडजोडींमुळे बाजार समितीच्या उत्पन्नावर प्रश्नचिन्ह




तामसा (प्रतिनिधी )हदगाव कृषी उत्पन्न बाजार समिती अंतर्गत येणाऱ्या तामसा उपबाजार समितीमध्ये गेल्या काही वर्षांपासून सुरू असलेल्या कारभारावर आता गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. शेतकऱ्यांच्या हितासाठी उभारण्यात आलेल्या बाजार समितीत प्रत्यक्षात व्यापारी आणि काही अधिकाऱ्यांचे वर्चस्व वाढल्याची चर्चा परिसरात रंगू लागली आहे.

काही वर्षांपूर्वी तामसा उपबाजार समितीतील गाळे वाटप प्रक्रियेत शेतकऱ्यांना प्राधान्य देण्याऐवजी व्यापारी आणि अधिकाऱ्यांच्या जवळच्या व्यक्तींना लाभ देण्यात आल्याचा आरोप स्थानिक स्तरावरून होत आहे. यामुळे बाजार समितीची मूळ उद्दिष्टे बाजूला पडून आर्थिक हितसंबंधांना अधिक महत्त्व दिले गेल्याचे बोलले जात आहे.

सध्या तामसा बाजारपेठेत दररोज जवळपास दहा हजार क्विंटल हळदीची आवक होत असूनही कृषी उत्पन्न बाजार समितीला अपेक्षित महसूल मिळत नसल्याची बाब समोर येत आहे. बाजार समितीने निश्चित केलेल्या कर आकारणीप्रमाणे वसुली होत नसल्यामुळे समितीच्या उत्पन्नाचा मेळ लागत नसल्याची चर्चा व्यापारी व शेतकरी वर्गात सुरू आहे.

विशेष म्हणजे, हळदीच्या खरेदी-विक्रीमध्ये पारदर्शक लिलाव पद्धतीचा अभाव असल्याने शेतकऱ्यांना कवडीमोल भावात माल विकावा लागत असल्याची तक्रार शेतकरी व्यक्त करत आहेत. अधिकृत लिलाव प्रक्रिया राबविली जात नसल्यामुळे काही व्यापाऱ्यांकडून मनमानी दर ठरविले जात असल्याचे आरोप आहेत. परिणामी शेतकऱ्यांच्या मेहनतीला योग्य मोबदला मिळत नसून आर्थिक फटका बसत आहे.

बाजार समिती प्रशासनाने या प्रकाराकडे गांभीर्याने लक्ष देऊन संपूर्ण व्यवहार पारदर्शक करण्याची मागणी शेतकरी वर्गातून होत आहे. तसेच गाळे वाटप, कर वसुली आणि हळद खरेदी प्रक्रियेची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.तामसा परिसरातील हळद उत्पादक शेतकऱ्यांचे अर्थकारण मोठ्या प्रमाणात या बाजारपेठेवर अवलंबून असल्याने संबंधित यंत्रणांनी तातडीने हस्तक्षेप करून शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## हदगाव तालुक्याच्या विविध प्रश्न, समस्या, मागण्यासाठी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जलसंपदामंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, पालकमंत्री अतुल सावे यांची

# भाजपाचे तालुकाध्यक्ष भागवत देवसरकर यांनी घेतली मंत्रालयात भेट; दिले निवेदन!



तामसा (प्रतिनिधी )

हदगाव तालुक्यातील शेतकरी, कष्टकरी, नागरिक, सिंचनाच्या विविध प्रलंबित प्रश्न आणि विकासात्मक मागण्यांसंदर्भात मुंबई येथे मंत्रालयात महाराष्ट्राचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जलसंपदामंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, पालकमंत्री अतुल सावे यांची भारतीय जनता पार्टीचे हदगाव तालुकाध्यक्ष भागवत देवसरकर यांनी भेट घेतली, या मान्यवरांच्या महत्त्वपूर्ण भेटीदरम्यान त्यांनी हदगाव तालुक्यातील जनतेच्या आणि भागाच्या विकासाशी संबंधित विविध मागण्यांचे सविस्तर निवेदन मंत्री महोदयांना सुपूर्द केले.

हदगाव तालुक्यातील ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा, शेतकरी बांधवांचे प्रश्न, महसूल, ग्राम विकास कृषी जलसंपदा विभागाशी संबंधित प्रलंबित कामे आणि स्थानिक विकासाला गती देण्यासाठी आवश्यक असणार्या विविध विषयांवर भेटीदरम्यान चर्चा केली. तालुक्यातील जनहिताचे प्रश्न तातडीने मार्गी लागावेत, अशी आग्रही मागणी यावेळी करण्यात आली.

या प्रसंगी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, जलसंपदामंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, पालकमंत्री अतुल सावे यांनी हदगाव तालुक्यातील सर्व मागण्यांवर सहानुभूतीपूर्वक विचार करून संबंधित विभागाच्या वतीने तातडीने योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, असे ठोस आश्वासन यावेळी दिले असल्याची माहिती भागवत देवसरकर यांनी दिली. या भेटीमुळे हदगाव तालुक्यातील अनेक प्रलंबित विकासकामांना आणि प्रश्नांना आता वेग मिळण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत. यावेळी भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाचे परमेश्वर काळे, कैलास चव्हाण, दीपक पटणे आदी उपस्थित होते.



# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौंडी रथयात्रेचे विष्णुपुरी काळेश्वर येथे जलपुजन..

नवीन नांदेड -विष्णुपूरी काळेश्वर येथील गोदावरी नदी येथुन जल यात्रा दि.२६ मे रोजी नांदेड जिल्हा प्रमुख ड.शिवाजीराव व विश्वस्त शंकरराव हंबर्डे व पदाधिकारी यांच्या हस्ते जलपुजन करून यात्रेच्या शुभारंभ करण्यात आला.

श्री मल्हारी मार्तंड खंडोबाचे माळेगाव ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर मातेच्या चौंडी रथयात्रा ता.जामखेड गोदावरी नदी ते सीनानदी जल यात्रा सुरुवात केली जशी महाराष्ट्र सरकारने गोदा ते नर्मदा अशी जल यात्रा काढून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर मातेच्या इतिहासाला उजाळा दिला असून ,नांदेड जिल्हा सकल धनगर समाजाचा आधार स्तंभ अँड शिवाजीराव यांच्या हस्ते जलपुजन करण्यात आले, यावेळी काळेश्वर महादेव मंदिराचे विश्वस्त शंकरराव हंबर्डे माजी जिल्हा परिषद अध्यक्ष संभाजीराव धुळगुंडे, प्रा.मुरहरी कुंभारगावे रथयात्रा दिंडीचे प्रमुख इंजी. बालाजीराव काळे , माजी सरपंच पिराजी धुळगुंडे स व लक्ष्मण यांच्या सह सेवक गोविंद गोरे कौठा नांदेड यांच्यी उपस्थिती होती.

# केज तालुक्यात वादळी पावसाचा कहर; केळी, ऊस शेतीसह घरांचे प्रचंड नुकसान ;एका शेतकऱ्याचा दुर्दैवी मृत्यू

केज ।प्रतिनिधी

केजतालुक्यात नुकत्याच झालेल्या अवकाळी पाऊस आणि तीव्र वादळामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे.या नैसर्गिक आपत्तीत केळीच्या बागा आणि उसाचे पीक भुईसपाट झाले असून, अनेक घरांची पडझड झाली आहे.तसेच अनेक जनावरे दगावल्याचीही माहिती आहे.अत्यंत दुर्दैवी बाब म्हणजे या वादळात एका शेतकऱ्याचा वीज पडून मृत्यू झाला आहे.या पार्श्वभूमीवर नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ शासकीय मदत मिळावी,यासाठी शिवसेना पदाधिकाऱ्यांनी केजच्या तहसीलदारांना एक सविस्तर निवेदन दिले आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून पाठपुरावा करणार

तहसीलदारांना निवेदन दिल्यानंतर प्रसार माध्यमांशी बोलताना पदाधिकाऱ्यांनी सांगितले की,केज तालुक्यातील शेतकरी आधीच संकटात असताना या अवकाळी पावसाने त्यांच्या तोंडचा घास हिरावून घेतला आहे.प्रशासनाने तात्काळ पंचनामे करून मदतीचे प्रस्ताव शासनाकडे पाठवावेत.राज्याचे लाडके मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांच्या माध्यमातून आम्ही या प्रस्तावांचा गतीने पाठपुरावा करू आणि बाधितांपर्यंत लवकरात लवकर भरघोस मदत पोहोचवण्यासाठी कटिबद्ध राहू असे त्यांनी सांगितले.यावेळी निवेदन देताना नेत्यांची व शिव सैनिकांची उपस्थिती होती.शेतकऱ्यांच्या या न्याय्य मागणीसाठी केज तहसील कार्यालयात मोठ्या संख्येने शिवसैनिक,पदाधिकारी एकत्र आले होते.यामध्ये प्रामुख्याने खालील नेत्यांचा



सहभाग होता.माजी आमदार तथा शिवसेना उपनेत्या सौ. संगीताताई ठोंबरे, शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन भैय्या मुळूक,शिवसेना तालुकाप्रमुख पृथ्वीराज पाटील,विधानसभा प्रमुख दादासाहेब ससाने,युवा सेना तालुका प्रमुख दत्तकुमार काकडे, तालुका उपप्रमुख महेंद्र चाटे,योगेश देशमुख,तालुका सचिव विकास काशीद,युवासेना शहर प्रमुख आकाश चाळक,शेतकरी सेना तालुका प्रमुख आदित्य रांजनकरयुवासेना उप तालुका प्रमुख ज्ञानेश्वर भांगे, शिवाजी गायकवाड तालुका संघटक, विश्वासराव जाधव ज्येष्ठ शिवसैनिक प्रकाश गुंड, संतोष बुडूक,अशोक जोगदंड,शिवशंकर नाईकनवरे,अजय तांबे, शुभम गंभीरे,पृथ्वीराज इंगळे,आदेश देशमुख, स्वप्निल पवार,विलास घुले,उमेश माने,बापू गालफाडे,आसिफ शेख, श्रीराम कदम,बब्रुवान इंगळे,महादेव कदम यांच्यासह तालुक्यातील शिवसैनिक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मागण्यांचे प्रमुख मुद्दे- वादळामुळे झालेल्या पिकांच्या नुकसानीचे अचूक व तात्काळ पंचनामे करावेत,मृत शेतकऱ्याच्या कुटुंबाला शासनाकडून आर्थिक मदत तात्काळ मंजूर व्हावी,पडझड झालेली घरे आणि दगावलेल्या जनावरांचे तातडीने सर्वेक्षण करून भरपाई मिळावी अशा मागण्यांचे निवेदन तहसीलदार अशोक भंडारे यांना सादर करण्यात आले.